


# HAKARA Quarterly

Vol. 17, 2 • April - June 1996

# हाकारा

वर्ष सतरावे • अंक दुसरा

एप्रिल - जून १९९६





# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार***

## कार्यकारी मंडळ


| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| उपाध्यक्ष | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## HAKARA Quarterly

## अनुक्रमणिका

संपादकीय — २

❖ महाराष्ट्र : सामाजिक व आर्थिक परिस्थिती
अभ्यास दौरा रोजनिशी : पुरूषोत्तम आगाशे — ५
- मोखाडा — ५
- पेठ सुरगाणा — २४
- अभ्यास दौऱ्यातील निष्कर्ष — ३२

❖ ओरिसा : सामाजिक व आर्थिक परिस्थिती
अभ्यास दौरा अहवाल : प्रा. रा. के. मुटाटकर, नॅन्सी गायकवाड — ३३
- दारिंगवाडी विभाग — ३३
- तुमडीबंध विभाग — ३८
- ओरिसातील आदिवासी स्त्री — ४०

❖ Tribal Development Programme in Maharashtra & Orissa : Prof. R. K. Mutatkar — 46

वर्ष सतरावे : अंक -दुसरा
एप्रिल-जून १९९६

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**छायाचित्रे व संपादन सहाय्य**
पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रू. १५/-**

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे ३०.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

## सर्वांगीण आदिवासी विकास प्रकल्प

भारतीय घटनेनुसार आदिवासी (अनुसूचित जमाती) व दलित (अनुसूचित जाती) यांना विशेष आरक्षण व सवलती देण्यात आल्या आहेत. अलीकडे इतर मागास वर्ग आणि महाराष्ट्रात भटक्या व विमुक्त जाती-जमाती त्याचप्रमाणे विशेष मागास संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहे. तरी आदिवासी व दलितांना घटनेनुसार दिलेल्या दर्जापेक्षा त्यांचा दर्जा वेगळा आहे. मागासलेपणाचे निकष केवळ आर्थिक नसून सामाजिक, शैक्षणिक व प्रशासनात तसेच राज्यशासनात सत्तेची भागीदारी किती प्रमाणात आहे हे आहेत. अस्मितेच्या व आत्मविश्वासाच्या अभावामुळे विकास योजना व कार्यक्रमांचा उपयोग आदिवासी व दलितांना करता येत नाही. त्यामुळेच त्यांना वेगळा दर्जा घटनेत देण्यात आला आहे. आदिवासी व दलितांमध्ये उच्च-नीच उतरंड आहेच. धर्मपरिवर्तनाचा कायमस्वरूपी परिणाम आदिवासी-दलितांच्या विकासावर दिसून येत नाही.

भारतीय समाजरचनेत दलितांपेक्षा आदिवासींना बरे स्थान आहे. त्यांची सामाजिक व आर्थिक पिळवणूक आधुनिक प्रशासन सुरू झाल्यापासून होत आहे. एरव्ही जंगलात, दऱ्याखोऱ्यात त्यांचे जंगलाशी, निसर्गाशी समन्वयाचे नाते होते व ते स्वतःस जंगलचे राजे म्हणवत. परंतु जंगल राष्ट्रीय संपत्ती, उपभोग आणि उत्पादनाचे साधन झाल्यामुळे आदिवासी समाज नागवला गेला. आदिवासी म्हणजे जंगलातून अन्न गोळा करणारा समाज. बाजारपेठांशी जवळीक असणाऱ्या हिंदू शेतीनिष्ठ समाज व आर्थिक व्यवस्थेत न बसणारा त्यामुळे मालवाहतुकीचे साधन बैलगाडी आदिवासी भागात केवळ 'श्रीमंत' किंवा सधन आदिवासीकडेच असते. देशाच्या विकासाकरिता किंवा सरकारी तिजोरी भरण्याकरिता ठेकेदार व भ्रष्ट नोकरशाही व राजकीय पुढारी यांच्या संगनमताने जंगलांचा नाश झाला. त्याच्या परिणामी, आदिवासींचे अन्न, चारा, पाणी व जमिनीचा कस यावर कुऱ्हाड कोसळली. नजिकच्या शेतीनिष्ठ समाजाकडे किंवा नगरांकडे आदिवासींचा लोंढा जगण्याकरिता वळला. राजाचा गुलाम झाला. अन्न, चारा व पाणी मिळवण्यासाठी आदिवासी स्त्री ची वणवण वाढली व तिच्यावरील अत्याचारही त्या प्रमाणात वाढले. आदिवासींचे स्वत्व व आत्मविश्वास नाश पावले.

या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्रात बायफ (भारतीय कृषी व औद्योगिक संस्थान) व ओरिसात निस्वास (राष्ट्रीय समाजकार्य व समाजशास्त्र संस्था) या संस्थांनी 'नाबार्डच्या' मदतीने काही सर्वांगीण विकासाच्या योजना आखल्या. त्या योजनांच्या आखणीस मदत करण्यासाठी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या अभ्यासकांनी महाराष्ट्रातील ठाणे-नाशिक जिल्ह्यात जव्हार, मोखाडा, पेठ, सुरगाणा व ओरिसात फुलबनी, रायगडा, कालाहांडी या जिल्हयातील आदिवासी तालुक्यांचा अभ्यास दौरा केला. हा अभ्यासदौरा फेब्रुवारी ते एप्रिल १९९६ दरम्यान करण्यात आला. त्यांत स्त्रियांची परिस्थिती, उत्पादन, खर्च, कर्जबाजारी, जगण्याकरिता स्थलांतर, जंगलाचा ऱ्हास, स्थलांतरित शेती इत्यादि विषयांचा अभ्यास करण्यात आला. आदिवासींची संस्कृती व समाजाच्या चौकटीत

त्यांचे प्रश्न समजण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा अभ्यास प्रा. रामचंद्र मुटाटकर व श्रीमती नॅन्सी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. त्याबरोबर शेती, फळबागा संबंधी तांत्रिक अभ्यास व आर्थिक बाबींची पाहणी एक जर्मन संशोधक श्री. येलिनेक व डॉ. ए. पी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या तांत्रिक व आर्थिक पाहणीचा अहवाल हाकारा च्या या अंकात समाविष्ट नाही.

थोड्या अवधीत इतक्या तालुक्यांचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रीय पण जलद अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला. प्रथम तालुक्याचा धावता दौरा करण्यात आला. या दौऱ्यात भौगोलिक परिस्थिती, झाडे, जंगले, दऱ्या-खोरी यांचे अवलोकन झाले. नद्या, पाणी, जमिनीची पत, शेती, गावांची रचना इत्यादि गोष्टी निर्दशनास आल्या. कांही गावांची प्राथमिक माहिती किंवा नावे माहिती होती, तेथे साधारण तासभराचा मुक्काम करून लोकांशी गप्पांच्या रूपाने सामाजिक-आर्थिक परिस्थितीची कल्पना घेतली. स्त्रियांशी वेगळ्या समूहात भेटून त्यांच्या समस्यांबाबत माहिती घेण्यात आली. कांही गावात थंड प्रतिसाद मिळाला तर बऱ्याच गांवात रात्री राहण्याचे आमंत्रण दिले गेले. त्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात किमान दोन गावे सखोल अध्ययनासाठी निवडण्यात आली. या गावात रात्रीचा मुक्काम करून प्रत्येकी १०-२० कुटुंबाची त्यांचे उत्पादन, खर्च, कर्जबाजारीपणा इ. बाबत तपशीलवार माहिती घेतली. महिलांच्या वेगळ्या सभा घेण्यात आल्या. त्यात महिलांच्या प्रश्नांची जसे पाणी, चारा, जळण, दारूचे व्यसन इ. विषयावर चर्चा झाली. शिक्षक, पुढारी, ग्रामसेवक, आरोग्यसेवक, तलाठी इ. च्या मुलाखती घेण्यात आल्या. आठवड्याच्या बाजारांचाही खरेदी-विक्रीच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला. स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते व पुढारी तसेच शासकीय विकास व जंगल अधिकाऱ्यांशीही चर्चा झाल्या.

हाकाराच्या या अंकात पश्चिम महाराष्ट्र व ओरिसा येथील आदिवासींची परिस्थिती मांडण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील ठाणे व नाशिक जिल्ह्यातील आदिवासींना सहा ते नऊ महिन्यांपेक्षा जास्त जगण्याचं साधन नसतं. त्यामुळे मुंबई, ठाणे, भिंवडी, नाशिक येथे स्थलांतर करण्याशिवाय गत्यंतर नसतं. या भागात शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या आश्रमशाळांमुळे शिक्षणाचा प्रसार चांगला आहे. पण सुशिक्षित बेकारीची समस्या आहे. सुशिक्षित तरूणांस नोकऱ्या हव्यात, शेतावर काम करावयास नको. स्थलांतरामुळे स्त्रियांचा कामाचा बोजा वाढला आहे. चारा, पाणी, लाकूडफाटा शिवाय शेतीची कामेही स्त्रियांना करावी लागतात. पुरूषांचे दारू व्यसन ही कायम डोकेदुखी आहेच. विकासकार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असल्यामुळे विकास झालेला दिसत नाही. खेड्यांमध्ये वीज पोहोचली आहे, टी.व्ही. आहे. त्याचा उपयोग हिंदी सिनेमा, गाणी व क्रिकेट पाहाण्याकरिता होतो. पाण्याचे दुर्भिक्ष फार मोठ्या प्रमाणावर आहे. महाराष्ट्रात राजकीय जागृती चांगली आहे. काँग्रेस, भारतीय जनता पार्टी व कम्युनिस्ट मार्क्सिस्ट यांचा चांगला प्रभाव आहे. बायफच्या वाडी प्रकल्पाबाबत बऱ्याच लोकांनी माहिती आहे व तशा प्रकल्पाचे स्वागत होईल. शेतमजुरांना व स्त्रियांना किती व कसे काम मिळेल ही खरी समस्या आहे.

ओरिसातील आदिवासींची परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रापेक्षा वेगळी आहे. ओरिसातील जंगले अजून हिरवीगार आहेत, भरलेली आहेत. परंतु 'पोडू' नामक स्थलांतरित शेतीमुळे जंगले उघडीबोडकी व्हावयास लागली आहेत. ओरिसात मुंबईसारखी माणसं खाणारी शहरे नाहीत. आदिवासी क्षेत्राच्या जवळपास तर नाहीतच. त्यामुळे जमिनीची भूक जंगल साफ करून, शेती करून भागविली जाते. महाराष्ट्रातील जंगल जमिनीचे अतिक्रमण ही मोठी समस्या आहेच. पोडू जमिनीची मालकी, भागीदारी तत्वावर सर्व आदिवासी समूहाची असते. त्याची निवड, जमीन तयार करणे, वाटणी ही सामूहिकरित्या ज्या त्या कुटुंबाच्या गरजेनुसार साम्यवादी तत्वावर ठरविली जाते. पंगु व वृद्धांना वगळण्यात येत नाही. त्यांच्या जगण्याची जबाबदारी सामूहिकरित्या पार पाडली जाते.

ओरिसात आदिवासी व दलित मोठ्या संख्येने एकाच खेड्यात, प्रदेशात राहतात. आदिवासी व दलित दोघेही ख्रिश्चन धर्मांतरित असले तरी एकाच चर्चचे सदस्य नसतात. आपले वेगळेपण चर्चच्या सदस्यत्वातून दर्शवितात. आदिवासी स्वत:ला जंगल-जमीनीचे मालक समजतात. दलित त्यांच्या मर्जीने शेती करतात. पण इतर हस्तकला, छोटी दुकाने, व्यापार इ. दलित करतात व आदिवासींचे दलाल म्हणून बाजारपेठात जातात.

कांही ठिकाणी शासनाने डोंगरी भागातील कोंड व अतिमागासलेले कुटिया कोंड यांच्याकरिता वेगळ्या विकास योजना आखल्या आहेत. अननस, केळी, हळदीचे उत्पादन यामुळे आदिवासींचा विकास होण्यास मदत झाली आहे. परंतु ओरिसात संख्येने जरी जास्त स्वयंसेवी संस्था असल्या तरी विकास कार्यक्रम राबविण्यात त्या सक्षम नाहीत. स्त्रियांचे प्रश्न महाराष्ट्राप्रमाणेच आहेत. राजकीय जागृति नाही, शिक्षणाचा प्रसार व आरोग्यसुविधा अल्प आहेत. कुटीया कोंड भागात मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण नजरेत सहज भरते. ज्या डोंगरी कोंड प्रदेशात फळबागांची लागवड झाली आहे तेथे 'पोडूचे' प्रमाण लक्षणीय घटले आहे.

सारांश, पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतर व ओरिसात स्थलांतरित शेती हे आदिवासींचे बिकट प्रश्न आहे. मुंबईसारख्या शहरांमुळे आदिवासी मनुष्य व संस्कृती यांचा ऱ्हास अटळ आहे. ओरिसात अजून जंगलात खायला मिळतं. पण ते किती दिवस चालणार? यातून मार्ग काढायचा म्हणजे सुधारित शेती, फळबाग प्रकल्प, उत्पादनाच्या बाजारपेठेची योग्य सोय व स्त्रियांना पूरक व्यवसाय उपलब्ध करणे हाच आहे. शासकीय यंत्रणेत या गोष्टी होणे शक्य नाही. केवळ सेवाभावी स्वयंसेवी संस्था या जबाबदाऱ्या पेलू शकतात. याबाबत चर्चा व अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी हाकाराकडून स्वागत आहे.

**- रा. के. मुटाटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# महाराष्ट्र : सामाजिक व आर्थिक परिस्थिती

## अभ्यास दौरा रोजनिशी

**पुरुषोत्तम आगाशे**

स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होत आली तरी देशामध्ये सामाजिक व आर्थिक सुधारण अपेक्षित प्रमाणात होऊ शकल्या नाहीत. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी कमी होण्याऐवजी रूंदावतच चालली आहे. एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के असलेला आदिवासी समाज दऱ्याखोऱ्यातून वसलेला असल्याने आत्तापर्यंत दुर्लक्षितच राहिला आहे. सरकारने आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी योजना सुरू केल्या असल्या तरी अपेक्षित लक्ष्य साधले गेले नाही. जंगलांचा ऱ्हास झाल्याने आदिवासींची फरफट आणखीनच वाढली. त्यामुळे पोटासाठी आदिवासी औद्योगिक नगरांकडे खेचला गेला. अकुशल व असंघटित असल्याने शहरांमध्येही आदिवासींचे शोषण चालूच आहे.

आदिवासींच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारप्रमाणेच काही स्वयंसेवी संस्थाही कार्यरत आहेत. त्यापैकी एक म्हणजे बायफ (भारतीय कृषी व औद्योगिक संस्थान) आदिवासींना त्यांच्याच गावामधून रोजगार व अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून द्यावे, त्यांच्या आहाराचा प्रश्न सोडवावा त्याचप्रमाणे पर्यावरणाचा समतोल राखता यावा या ध्येयातून कै. मणिभाई देसाईंनी 'वाडी प्रकल्प' सुरू केला. या वाडी प्रकल्पाअंतर्गत पडिक जमिनीवर लावण्यासाठी आदिवासींना आंब्याची तसेच इतर जंगल झाडे दिली जातात. त्याचबरोबर इतर पिके व भाज्या लावण्यासाठी शेतकऱ्यांना उद्युक्त केले जाते. गुजरात राज्यातील वांझदा तालुक्यात (जि. बलसाड) हा प्रयोग यशस्वी झाला आहे. १९९३ पासून जव्हार तालुक्यात हा प्रकल्प सुरू झाला आणि तीन वर्षात एकूण ८०० कुटुंबे या कार्यक्रमात सहभागी झाली आहेत.

महाराष्ट्र राज्यातील इतर आदिवासी तालुक्यातही हा प्रकल्प राबवता येईल का हे पाहण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. मोखाडा (जि. ठाणे), पेठ व सुरगाणा (जि. नाशिक) या तालुक्यात राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) व जर्मन बँक यांच्या वतीने हा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासामध्ये तालुक्यातील आदिवासी लोकांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती त्यांचे राहणीमान, स्त्रियांचे समाजातील स्थान आदि गोष्टींचा अभ्यास केला गेला.

अभ्यास दौऱ्यातून समोर आलेले चित्र रोजनिशीच्या स्वरूपात मांडले आहे. त्यातून आदिवासी खेड्यापाड्यातून रहाणाऱ्या लोकांची परिस्थिती, त्यांचे विचार, विकासाच्या संकल्पना मांडण्याचा हा एक प्रयत्न.

## मोखाडा

**सोमवार** **१९ फेब्रुवारी १९९६**

दुपारी पुण्याहून मी, प्रा. मुटाटकर आणि बायफचे मुकेश कणसकर असे तिघेजण जीपने निघालो. वाटेत पनवेलला नॅन्सी गायकवाडना घेऊन नऊच्या सुमारास जव्हारला पोहोचलो.

रात्री दहा वाजता जेवण करून लॉजकडे परतत असताना सहज म्हणून डोकावून पाहिलं, बबनशेठ तेंडुलकर त्यांच्या घराबाहेरच खुर्ची टाकून बसले होते. मुटाटकर सरांची आणि त्यांची गेल्या तीस वर्षांपासून ओळख आहे. विद्यार्थ्यांचे जव्हार तालुक्यातील अभ्यास दौरे, समाजशास्त्र शिकवणाऱ्या शिक्षकांची कार्यशाळा वगैरे गोष्टींसाठी त्यांनी खूप मदत केली आहे. आम्हाला बघताच त्यांनी हसून स्वागत केले आणि त्यांच्या कार्यालयात घेऊन गेले.

बबनशेठ तेंडुलकर म्हणजे जव्हारमधील एक मान्यवर व्यक्तिमत्व. गेली ३०-३५ वर्षे भाताची गिरणी चालवत

आहेत. त्यामुळे त्यांचा इथल्या आदिवासी लोकांशी सतत संपर्क येतो. त्यांना आदिवासींच्या प्रश्नांची चांगलीच जाण आहे. जव्हार नगरपरिषदेचे अध्यक्षपद ते गेली वीस वर्षे अखंडपणे सांभाळत आहेत. त्यांच्या कार्यालयामध्ये सुद्धा आधुनिकीकरणाच्या खुणा दिसू लागल्या आहेत. भातगिरणीचे हिशोब ठेवण्यासाठी त्यांनी संगणक बसवून घेतला आहे. आता इथल्या आदिवासींपर्यंतही हे तंत्रज्ञान लवकरच पोहोचेल आणि नक्कीच आत्मसात केले जाईल अशी आशा वाटते. आम्ही आमच्या कामाला बबनशेठांच्या मुलाखतीपासून सुरूवात केली. कॉफी घेता घेता बबनशेठ तेंडुलकरांशी आदिवासी आणि त्यांचा विकास या विषयावर चर्चा सुरू झाली.

आपले अनुभव सांगताना ते म्हणाले; ''भात गिरणीत भात सडायला येणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांचे प्रमाण आजकाल कमी होत चालले आहे. भात, नागली, वरई यासारख्या पिकांचे उत्पादन आता खूप कमी झाले आहे.'' त्याचे कारण विषद करताना त्यांनी सांगितले ''शिक्षणाची संधी उपलब्ध झाल्याने घरातील दोन तीन मुलं किमान दहावी पर्यंत तरी शिकतात. त्यामुळे शेतामध्ये श्रम करायला ही मुलं तयार होत नाहीत. यावर उपाय म्हणजे इथे कमी कष्टात येणारी पिकं घ्यायला पाहिजेत. भुईमूग इथे चांगला येऊ शकेल. ऊससुद्धा लावायला हरकत नाही. या भागात एका शेतकऱ्याने हा प्रयोग यशस्वी करून दाखवला आहे. डोंगरावर पाणी चढवून ऊस केला आहे.''

इथल्या भागाचा विकास कितपत झाला आहे? असे विचारता ते उत्तरले ''हा भाग खूपच विकसित झाला आहे. पूर्वी वाहतुकीची साधने अजिबातच नव्हती. चालतवडलासुद्धा (२० किमी) पायी जावे लागायचे. मी सुद्धा १९७० साली वावरपर्यंत (४५ किमी) पायी जाऊन आलो आहे. आता एस.टी. ची सोय झाली आहे. लोकांना पण एस.टी. ची इतकी सवय झाली आहे की लोकं एक किलोमीटर सुद्धा चालायला तयार नसतात. हा भाग आता केवळ नावाला आदिवासी राहिला आहे.''

मोखाडा तालुक्यात शेती विकासासाठी कुठला भाग निवडला पाहिजे? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले ''पाणी जिथं जास्त असेल अशीच गावं सर्वप्रथम निवडली पाहिजेत. त्यादृष्टीने खोच, आडोशी, बोटोशी ही गावे चांगली आहेत. वाडी योजनेत (फळझाडे लागवड) पहिल्यांदा कोकणा लोकांना सामील करून घेतले पाहिजे. कोकणा लोकं शिकलेली असतात, त्यांच्याकडे जमीनही असते. या लोकांनी प्रयोग केले म्हणजे मग इतरही लोकं (वारली, ठाकर, कोळी वगैरे) तयार होतील. तशा सरकारच्या बऱ्याच योजना दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी असतात पण त्याचा त्यांना उपयोग होऊ शकत नाही.''

'बायफ'ने सुरू केलेल्या वाडी प्रकल्पाबाबत बोलताना बबनशेठ म्हणाले. ''खरोंदा, चांभारशेत, पिंपळशेत या भागात पाणी चांगलं असल्याने बायफचा वाडी प्रयोग यशस्वी झाला आहे. त्यांचं काम योग्य प्रकारे चालले आहे. झाडं चांगली वाढत आहेत. लावलेल्या झाडांपैकी ९०% झाडे जगली आहेत. अजून आठ-दहा वर्षांनी झाडांपासून मिळणाऱ्या फळांमुळे लोकांच्या हातात पैसे यायला लागतील. लोकांच्या राहणीमानात खचितच फरक पडेल.

तशी सरकारी खात्यातर्फे सुद्धा झाडे लावली जातात पण त्यांचं पुढं काय होतं ते आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे.

या आदिवासी भागात वनखात्याने बरेच बंधारे बांधले आहेत. त्यातून पावसाळ्यानंतर सुद्धा पाच सहा महिने पाणी मिळू शकते. अशा पाण्यावर दुसरे पीक येऊ शकते.''

या भागाच्या विकासाच्या दृष्टीने आणखी एक कल्पना त्यांनी मांडली ''जव्हार सारख्या तालुक्याच्या ठिकाणाचा पर्यटन केंद्र म्हणून विकास केला पाहिजे. तसे हे जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण आहे. पूर्वीच्या काळी जव्हार हे संस्थान असल्याने इथं आदिवासी राजाचा राजवाडादेखील आहे.

जव्हार गावच्या आजुबाजूच्या ५ - १० कि. मी. परिसरातील आदिवासींना त्यांची जमीन विकण्याची परवानगी सरकारने दिली पाहिजे. आम्ही तसा प्रस्ताव सरकारकडे

पाठवला आहे. इथली आजुबाजूची जमीन तशी पडीकच आहे. डोंगराळ जमिनीत कुठलेच पीक येऊ शकत नाही. ना धड आदिवासींना उपयोग, ना इतरांना. जर जमीन विकली तर लोकांच्या हातात पैसा तरी येईल. तसेच पर्यटन उद्योगामुळे त्यांना कामधंदासुद्धा मिळू शकेल.

मात्र त्याआधी इथला पाण्याचा प्रश्न सोडवला पाहिजे. सध्या तसे पाणी पुरेसे असते. पण पर्यटन केंद्र सुरू झालं तर पाण्याचा खप वाढेल आणि येणारा पर्यटक हा पाण्याचा विचार करतोच, त्यासाठी एखादी मोठी पाणीपुरवठा योजना राबवली लागेल.''

कधीही न संपणाऱ्या विषयावर एक तास चाललेली चर्चा आवरती घेतली, बबनशेठ तेंडुलकरांना धन्यवाद देऊन आम्ही लॉजवर परतलो.

**मंगळवार २० फेब्रुवारी १९९६**

सकाळी बायफच्या लोकांबरोबर खरोंदा या गावातील शेतकऱ्यांनी लावलेला वाडी प्रकल्प बघायला गेलो. दोन वर्षांपूर्वी याच खरोंदा गावामध्ये बायफसाठी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतर्फे पायाभूत सर्वेक्षण करण्यात आले होते. आज परत एकदा गाव बघण्याचा योग आला. गावापर्यंत आता डांबरी सडक झाली आहे. पूर्वी या गावची लोकं एस.टी. पकडायला १० कि.मी. चालून चालतवडला जात होती. सकाळी सातची एस. टी. पकडायची असेल तर पहाटे पाच वाजताच निघावे लागायचे. आता हळूहळू परिस्थिती बदलत आहे.

गावात शिरायच्या आधीच सारा परिसर फेब्रुवारी महिन्यात देखील एकदम हिरवागार दिसला. बायफनं घडवून आणलेली ही किमया आहे. डोंगर उतारावरून येणारे, तसेच नदीचे पाणी योग्य ठिकाणी रिकाम्या पोत्यांमध्ये माती भरून कच्चा बंधारा घालून अडवले आहे. अगदी स्वस्तात व सोप्या पद्धतीने बांधल्या जाणाऱ्या या बंधाऱ्याच्या कामासाठी शेतकऱ्यांचीच मदत घेतली जाते. सरकारी योजनेतून घेतलेल्या पंपातून खेचल्या जाणाऱ्या पाण्याने आजुबाजूचा सारा परिसर भिजवला जातो. हे पाणी साधारणपणे पावसाळ्यानंतर पाच-सहा महिने टिकते. या पाण्यावर कलिंगड, हळद, कांदा, टोमॅटो, वांगी, घेवडा तसेच निरनिराळ्या प्रकारच्या पालेभाज्यादेखील घेतल्या जातात.

वाडी कार्यक्रमाअंतर्गत आंब्याची लागवड केलेली आहे. एका एकरामध्ये चाळीस झाडे लावली जातात. झाडांची योग्य काळजी घेतल्याने चांगलीच वाढ दिसून येते. दोन तीन वर्षांपूर्वी ओसाड असणाऱ्या परिसराचा कायापालट होण्यामागे शेतकऱ्यांचे अपार कष्ट व बायफच्या शेती तंत्रज्ञांचे योग्य मार्गदर्शन कारणीभूत आहे.

गावामध्ये धवळू भुसारा यांच्या घरी लोकांची छोटीशी सभा घेण्याचे ठरले. दोन वर्षांपूर्वी आलो होतो तेव्हा धवळू काकांच्याच घरी राहिलो होतो. त्यांच्या घरामध्ये आता बराच बदल झाला आहे. कुडाच्या भिंती जाऊन विटांचे घर बांधले गेले आहे. विटा गावातच भट्टी लावून पाडून घेतल्या. सरकारी योजनेतून वर्षापूर्वी संडास बांधला होता. पण सहा महिन्यानंतर वापर थांबला आहे. त्यांच्या घराजवळच आधी बायफने कच्चा बंधारा बांधला होता. वर्षानंतर त्या जागेपासून थोडे पुढे सरकारी योजनेतून पक्का सिमेंटचा बंधारा बांधला गेला. पाया खोदताना ब्लास्टिंग (सुरूंगाचा वापर) केले गेले. त्यामुळे खालच्या खडकांना भेगा पडल्या. आता पाणी पावसाळ्यानंतर दोन महिनेसुद्धा टिकू शकत नाही.

गावातल्या सभेला २५-३० पुरूष आणि १०-१२ बायका तसेच बायफचा कर्मचारी वर्ग पण होता. सर्व माणसे त्या मोठ्या घरात आरामशीरपणे बसली होती. आपला वाडीचा पहिला अनुभव सांगताना धवळू काका म्हणाले, ''पिंपळशेतला (२ कि.मी.) बायफचे श्री. राडे आणि वागळे गेले होते. लोकांना आंब्याची झाडं देणार असं कळलं. गावात झाडं देतील की नाही ही शंका होती. पण आम्ही दोघांनी ठरवलं, पावसाळ्याच्या आधी खड्डे खणून ठेवायचे, झाडं दिली तर चांगलंच नाही तर जाऊ दे. शेवटी पहिल्या वर्षी गावातल्या पाच जणांना चाळीस चाळीस झाडं मिळाली. अट मात्र एकच होती. दारू सोडायची. आधी

थोडं कठिण वाटलं पण आता तीन वर्षामध्ये गावातल्या पासष्ठ कुटुंबापैकी ५६ जणांनी वाडी घेतली आहे.''

गावाच्या आजुबाजूला असणाऱ्या हिरव्यागार जमिनींबद्दल सांगताना एक शेतकरी म्हणाला ''सध्या खरोंदा गावात दोन जणांनी कलिंगडाची लागवड केली आहे. मागच्या वर्षी भाव खूपच कमी आला. २-४ रूपये नगाने कलिंगड विकले गेले. त्यावेळेस दलालांनी फसवले. आता मात्र फसणार नाही. मागच्या वर्षीसारखाच यंदासुद्धा जव्हारला कलिंगडाचा स्टॉल टाकायचा विचार आहे. जागेसाठी प्रयत्न सुरू आहेत.

यंदासुद्धा एक दलाल आला होता. टनाला १,५०० रूपये भाव देईन असे म्हणाला. पण मी त्याला असे सांगितले २५०० रूपयापेक्षा एक पैसा कमी घेणार नाही. तो निघून गेला.''

शेतकऱ्याच्या बोलण्यातून पुरेपुरपणे आत्मविश्वास जाणवत होता, आणि तो व्यर्थ नव्हता याचे प्रत्यंतर दहाच दिवसात आले. जव्हारच्या स्टॉलवर एक एक कलिंगड २५-३० रूपयाला सहज विकले जात होते. माल दर्जेदार असल्याने कलिंगड हातोहात खपत होती. ज्या आदिवासीच्या हातात शंभर रूपयांची नोट सापडणे देखील अवघड होते आज त्याच आदिवासीची दिवसाची कमाई ८००-९०० रूपये बँकेच्या खात्यात जमा होत होती.

आदिवासी हळूहळू बदलत चालला आहे, विकासाच्या पाऊलखुणा आदिवासी भागात दिसू लागल्या आहेत.

खरोंदा गावातच शेतकऱ्यांनी भाजीपाला विकण्यासाठी विक्री केंद्र सुरू केले आहे. टोमॅटो, वांगी, कांदा, घेवडा यासारख्या भाज्या ४-५ रू. किलो दराने विकल्या जातात.

या विक्री केंद्रामुळे लोकांची फार सोय झाली आहे. त्यांच्या आहारातही फरक पडला आहे. पूर्वीच्या जेवणात भाजीच नसायची. उडदाची भाजी (घट्ट वरण), भात, भाकरी (मुख्यत्वे नागलीची) हाच त्यांचा मुख्य आहार होता.

आता शेतीमाल बराच तयार व्हायला लागला आहे, मालाला योग्य बाजारपेठ हा इथला मुख्य प्रश्न आहे. या लोकांना माल विकण्यासाठी जवळचा आठवडे बाजार म्हणजे तलासरी, पण त्यासाठी त्यांना गाडीभाडे परवडत नाही. बैलगाडीने माल नेण्यासाठी १०० रूपये मागतात. तर व्यापाऱ्यांना माल विकायचा म्हटलं तर खूप कमी भाव मिळतो.

बोलता बोलता पैसे, दारू व त्यावरून होणाऱ्या भांडणांचा विषय निघाला ''गावात अजूनही दोन तीन जणं दारू पिऊन बायकोला मारहाण करतात. पण लोकांचं दारू पिण्याचं प्रमाण तसं खूपच कमी झाले आहे. दारू पिऊन बायकोला मारहाण केली, त्रास दिला तर जात पंचायत बोलावली जाते. नवऱ्याला दंड केला जातो. अशा प्रकरणांमध्ये जात पंचायत बोलावणे भागच असते कारण ती स्त्री फार काळ सहन करू शकत नाही.'' ग्रामपंचायतीची महिला सदस्य म्हणाली.

या बरोबर घटस्फोट, मुलगी पळवून नेणे, भावाभावातील भांडणे हे विषयही पंचायतीत हाताळले जातात. ''शक्यतोवर गावाच्या बाहेर भानगडी जात नाहीत. पण अगदीच नाईलाज झाला तर पोलिसांना बोलावले जाते.'' धवळू काकांनी सांगितले.

मुलांचे शिक्षण या विषयावर बरीच चर्चा झाली. मुलांना शिक्षण द्यायचं का नाही? दिलंच तर कितवी पर्यंत द्यायचं? मुलींच्या शिक्षणाचं काय ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले गेले.

''आपला अनुभव सांगताना शंकर म्हणाला ''गावातील मुलं आठवी, नववी, दहावीपर्यंत देखील जातात आणि नापास होतात. अशी मुलं धड नोकरीही करत नाहीत किंवा त्यांना नोकरी मिळत नाही असे म्हणणे योग्य ठरेल. शेतात कष्टाची पण कामं करू शकत नाहीत. नुसतंच बसून इकडं तिकडं करत असतात.''

मुलांच्या शिक्षणाबाबतचं दु:ख सांगताना रखमी म्हणाली, '' आमच्या मुलांना आम्ही शाळेत जरी पाठवलं तरी त्यांचा अभ्यास आम्ही करून घेऊ शकत नाही. आम्ही पडलो अडाणी, त्यांच्या अभ्यासातील विषयाच्या अडचणी दूर



**खरोंदा गावातील कच्चा बंधारा**

करू शकत नाही. शहरातली लोकं त्यांच्या मुलांना शाळेत पाठवतात, संध्याकाळी आल्यावर त्यांचा अभ्यास घेतात, मुलांना नीट पद्धतीने समजावू शकतात, आम्ही तसं करू शकत नाही. मात्र मुलींना शिकवण्याचे प्रमाण वाढलेलं आहे.''

सकाळी जेव्हा गावात शिरलो तेव्हा शाळेत जाणाऱ्या मुलांचे पालक प्राथमिक शाळेमध्ये गेले होते. सरकारनं योजना जाहीर करून मुलींना शिक्षणासाठी शाळेत येता यावे म्हणून पालकांना दररोज एक रूपया मोबदला देण्याचे ठरवले आहे. हे पैसे घ्यायलाच पालक शाळेत गेले होते. मुलीला रोज शाळेत पाठवले तर ३० रू. महिना मिळतात. या योजनेमुळे शाळेमध्ये मुलींची उपस्थिती वाढली असल्याचे शाळेतल्या शिक्षकांनी सांगितले.

खरोंदा गावात पुरूषांचे दोन बचत गट स्थापन झाले आहेत. प्रत्येक गटामध्ये १२-१२ सदस्य आहेत. महिन्याला प्रत्येकी दहा रूपयाची बचत केली जाते. जमलेल्या निधीमध्ये बायफ संस्थेनेसुद्धा काही पैसे घातले आहेत. या पैशातून गेल्या वर्षी १ टेम्पो शेणखत आणून गावातल्याच शेतकऱ्यांना विकले गेले; त्यातून बचत गटांना बराच फायदा झाला.

महिलांचा बचत गट पण आता सुरू झाला आहे. सर्व महिलांनी मिळून काहीतरी करावे या भावनेने बचत गटाची स्थापना केली गेली. यापुढेही बचत गटातर्फे काय काय उद्योग करायचे ते सर्व बायका मिळून ठरवणार आहेत. अजून तसे काहीच नक्की नाही.

गावातले लोक सावकाराकडून आता कर्ज घेत नाहीत. कधी लागलं तर नातेवाईकांकडून कर्ज घेतलं जातं. एकमेकांना मदत केली जाते.

गावामध्ये बायफचा वाडी प्रकल्प सुरू झाल्यानंतर तो बघण्यासाठी तालुक्यातून, जिल्ह्यातून सरकारी अधिकारी इतर लोक गावाकडे यायला लागले. त्यामुळे कच्चा असणारा रस्ता, डांबरी केला गेला. रस्ता चांगला झाल्याने राज्य परिवहन महामंडळाने जव्हार-खरोंदा मार्गावर एस.टी. सुरू केली, लोकांची सोय झाली.

याचाच परिणाम म्हणून गावामध्ये गवताच्या व्यापाऱ्याने गवत खरेदी सुरू केली आहे. पडीक जमिनीत, डोंगर उतारावर वाढणाऱ्या गवताला आता थोडाफार भाव मिळायला लागला आहे. पूर्वी गवत वायाच जायचे. इथल्या लोकांच्या हातात हळूहळू पैसा खेळायला लागला आहे. बाहेरच्या जगाशी संपर्क वाढत चालला आहे.

सभा संपल्यानंतर धवळू काकांच्या घरीच जेवण झाले. नाचणीची भाकरी, डाळ, भात व शेतातून तोडून आणलेल्या वांग्याची भाजी असा मस्त बेत होता.

निघण्या आधी खुरकुट्यांच्या दोन तीन कुटुंबात जाऊन आलो. दोन वर्षापूर्वीची जुनी ओळख. त्यातले सखारामचे उदाहरण आवर्जून देण्यासारखे वाटते. विकासाच्या वाटेवर वेगाने निघालेल्या खरोंदा तसेच त्यासारख्याच अन्य गावांचे उदाहरण व्यक्ती, संस्था, शेतकरी व इतर अनेक गावांना खचितच प्रेरक ठरेल.

सखारामला स्वत:ची दोन एकर जमीन आहे. त्याला दोन मुलं, दोन मुली. त्यानं स्वत: नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतली आहे त्याबद्दल बोलताना तो म्हणाला, " माझ्या नावावर फारच थोडी जमीन आहे. जास्त पोरं असून काय उपयोग ? आम्हालाच खायला पुरेसं पडत नाही. तर मुलांना कुठून घालणार?" नसबंदीबद्दल त्याने सांगितले, "बाई माणसाची प्रकृती आधीच नाजूक असते. त्यातून त्यांनी ऑपरेशन करून घेतलं तर त्यांना त्रास होऊ शकतो. त्यांना शेतातली, घरातली कामं करावी लागतात. फाटीसाठी (सरपण), पाण्यासाठी जावं लागतं, म्हणून त्रास होऊ शकतो. पुरूष माणसाला काही त्रास होत नाही. लोकं म्हणतात की पुरूषाने ऑपरेशन केले तर कमजोरी येते. पण तसं काही नसतं. आता वयोमानाप्रमाणे शरीराची ताकद हळूहळू कमी होत जाते, आणि ती होत राहणारच"

हे उदाहरण तसे प्रातिनिधिकच म्हटले पाहिजे. कारण इथल्या बहुतेक पुरूषांनी नसबंदी करून घेतली आहे. आदिवासी भागाचे हे एक वैशिष्ट्यच मानावे लागेल, ठाणे, नाशिक, धुळे जिल्ह्यातूनही अशीच उदाहरणे आढळतात.

**बुधवार २१ फेब्रुवारी १९९६**

जव्हारहून सकाळी लवकर निघून मोखाड्याला पोहोचलो. आजपासून कामाला खरी सुरूवात झाली. सर्वप्रथम सबंध मोखाडा तालुका पालथा घालून दऱ्याडोंगरातील तसेच रस्त्यावरची अशा शक्य तितक्या सर्व गावांना पहिल्या एक दोन दिवसात भेट द्यायचा कार्यक्रम आखला. नंतर मग त्यातीलच दोन-तीन गावे निवडून त्यांचा अभ्यास करण्याचे ठरले.

प्रथम आसे-बेरिस्ता या मोखाडा तालुक्याच्या उत्तर भागात असलेल्या गावांपासून सुरूवात करण्याचे ठरले. मोखाड्याहून निघाल्यावर वाटेत काही आदिवासी बायका दुधाच्या रिकाम्या बरण्या घेऊन परतताना दिसल्या. जवळपासच्या खेड्यात राहणाऱ्या त्या बायका म्हशीचं दूध मोखाड्याला नेऊन विकतात. खरं म्हणजे अधिक चौकशी करायची होती पण प्रश्न विचारल्यावर काहीही उत्तर न देता त्या लाजत लाजत पुढे निघून गेल्या.

बेरिस्ता गाव मोखाड्यापासून १० कि.मी. अंतरावर आहे. रस्ता तसा कच्चाच. तालुक्याच्या उत्तर भागामध्ये रहदारी फारशी नाहीच. मोखाड्यापासून केवळ दिवसातून दोन वेळेलाच एस.टी. गावात येते. बेरिस्ता गावाला एकूण १२ पाडे आहेत. आम्ही तेलउंबर पाड्यात गेलो होतो. तिथंच ग्रामपंचायतीचं कार्यालय आहे. उंच लोखंडी अँटेना ग्रामपंचायतीत दूरध्वनी बसवल्याची साक्ष देत होता.

तेलउंबर पाडा तसा टेकाडावरच वसलेला आहे. गावात शिरताना डाव्या हाताला मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली बरेच देव बसलेले दिसतात. त्याच्याशेजारी विठ्ठल-रखुमाईचे मंदिर आहे. मंदिराजवळ अंगणवाडी भरते. गावात शिरतानाच मुख्य गोष्ट नजरेत भरली ती म्हणजे अत्यंत प्रशस्त अशी विटांनी बांधलेली सात दुमजली घरं. आदिवासी भागात आता विटांची घरं दिसू लागली आहेत; मात्र दुमजली घर बघायला मिळणे तसे विरळच.

पाड्यामध्ये एकंदर ४०-५० घरे असतील. इथे मुख्यत्वे महादेव कोळीच राहतात. तर बेरिस्ता गावात कोकणा, वारली, महादेव कोळी आढळतात. गावामध्ये वनवासी कल्याण आश्रमातर्फे प्राथमिक शाळेतील मुलांसाठी वसतिगृह चालवले जाते. इथे फिरता दवाखाना आहे. बहुतेक वेळा लोकांना त्याचा लाभ मिळू शकत नाही. गुरांचा दवाखाना देखील पहायला मिळाला.

यंदा नाचणीवर पिवळा रोग पडल्यानं तर भातावर सफेद रोग पडल्यानं पीक फारच कमी आलं आहे. एरवी सुद्धा शेतात पिकलेल्या धान्यावर फक्त काही जणच संपूर्ण वर्ष गुजराण करु शकतात. इतर लोक धान्य संपल्यानंतर म्हणजे संक्रांत किंवा शिमग्यानंतर मोलमजुरीसाठी बाहेरगावी कामाला जातात.

''इथल्या लोकांना मजुरीसाठी तालुक्याबाहेरच जावं लागतं, कारण तालुक्यात कामं मिळत नाहीत. इथले तहसिलदार, राजकारणी लोकं फारच बेकार लोक आहेत. सध्या पाण्याचे फारच हाल होतात. चैत्रात गावाजवळची विहीर आटली की दोन-तीन कि.मी. लांब जाऊन पाणी आणावे लागते. रात्रभर नंबर लावावा लागतो. जर का नदीवर व्यवस्थित बंधारा बांधला तर गावाला वर्षभर पाणी पुरू शकेल'' एका तरूणाने माहिती दिली.

इथल्या योजनांची तऱ्हाच न्यारी. वाघ नदीवर बंधारा बांधला आहे. पण पाणी साठून रहाण्याऐवजी बंधाऱ्याखालून वाहून जाते व त्यामुळे पिण्याच्या पाण्याची अडचण होते. 'पाणी अडवा पाणी जिरवा' योजनेप्रमाणे चार पाच मातीचे बंधारे बांधले आहेत. पण एक थेंबही पाणी साठत नाही. बंधाऱ्यासाठी असलेला पैसा भलतीकडेच अडून जिरला असावा.

आपली कैफियत मांडताना शिवा म्हणाला'' दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांना सरकारी योजनेअंतर्गत बकऱ्या देतात. त्यासाठी १२,००० रूपयाचं कर्ज भेटतं. त्यातले तीन हजार रूपये खातात. अन् नऊ हजार रूपये हाती पडतात. १६ बकऱ्या व एक बोकडाऐवजी, दहा बकऱ्या व एक बोकड भेटतो. या योजनेत दिल्या जाणाऱ्या बकऱ्या काठेवाडी असतात. त्या इथल्या डोंगराळ वातावरणाशी जुळवून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे काही दिवसातच त्या मरून जातात. त्याऐवजी स्थानिक बकऱ्या दिल्या पाहिजेत, ज्यांचा काहीतरी उपयोग होऊ शकेल.''

शिवा पुढे म्हणाला ''तीच गत फळझाडांची. सरकारनं आम्हाला पावसाळा संपत आल्यावर आंबा, काजूची रोपं दिली. पण नंतर पाण्याअभावी ती जगू शकली नाहीत. आजुबाजूचं जंगल आता कमी झालं आहे. आता जंगल उत्पादनही काही मिळत नाही. आमच्यापुढं मजुरी हाच एकमेव पर्याय उरला आहे.''

गावच्या विकासाबद्दल बोलताना सरपंच म्हणाले ''आमचं गाव नेहेमीच विरोधी पक्षाला साथ देत आल्याने गावाचा विकास होण्यात अडचण आली. आता आमचेच सरकार आल्याने विकासाला चालना मिळेल.''

गावातील बरेचसे कोकणा व महादेव कोळी माळकरी झाले आहेत. वारली लोकांची १०-१५ घरं आहेत. त्यांचं मात्र दारू पिणं अजून चालूच आहे.

बेरिस्त्याहून येताना चास गावामध्ये थोडा वेळ थांबलो होतो. या गावामध्ये ठाकर, महादेव कोळी व कातकरी लोक राहतात. गावातली कातकरी कुटुंबे खडी फोडण्याच्या कामासाठी तर इतर लोक डबर, रेती, खदानीच्या कामासाठी जातात. ७५% लोकांनी कामानिमित्त स्थलांतर केले असल्याने गाव सुनेसुने वाटत होते.

गावामध्ये अखिल भारतीय समाज प्रबोधन संस्थेतर्फे

पाळणाघर व बालवाडी चालवण्यात येते. गावाच्या आजुबाजूला खासगी व सरकारी मिळून एकंदर दहा विहिरी आहेत. विहिरींना पाणी देखील भरपूर आहे, पण विहिरी गावापासून लांब आहेत. शेतीबद्दल बोलताना इथला शेतकरी म्हणाला '' विहिरीवर मोटार बसवली तर उन्हाळी भात सुद्धा करता येईल. पण पैशाची समस्या आहे. एका शेतकऱ्यानं शेतामध्ये कलिंगड घेतलं होतं. पण मोकाट जनावरांनी शेतात शिरून नासधूस केल्यानं हाता तोंडाशी आलेलं पीक गेलं.''

मोखाड्याला परत आल्यावर इथले सा. बां. विभागाचे उप अभियंता श्री. पाटील यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन खोडाळा व मोखाडा येथील सरकारी विश्रामगृहांचे आरक्षण केले. खरं म्हणजे आज रमजान ईद, सरकारी सुट्टी. सकाळीसुद्धा त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला होता. पण फिरतीवर असल्याने भेटू शकले नाहीत. सुट्टीच्या दिवशीदेखील काम करणारी सरकारमधील माणसं बघून सुखद धक्का बसला.

मोखाड्याहून खोडाळ्याला जाताना खोच या गावी गेलो होतो. गावातील टागरट मुलांनी शिट्ट्या वाजवून गावाच्या वेशीपाशी आमचे स्वागत केले.

या गावची मुख्य समस्या म्हणजे पाणी. होळीनंतर गावातल्या विहिरी आटतात. विशेष म्हणजे गावाजवळ असलेल्या डोंगराच्या पलिकडेच १५ वर्षापूर्वीच मोठा बंधारा बांधला गेला आहे. पण त्याचा फायदा गावाला होऊ शकला नाही. आता सध्या गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजना करायचे चालले आहे. या गावामध्ये एका माणसाने एक ट्रक कलिंगड केलं होतं, काकडीसुद्धा लावली होती. पण योग्य भाव न मिळाल्याने नुकसान झाले.

दुपारी खोडाळा गावालगत असलेल्या विश्रामगृहामध्ये जाऊन स्थिरावलो.

जेवण झाल्यानंतर श्री. गंगोडा व श्री. मोरे या तलाठ्यांशी या भागातील लोकांचे शेती-पाण्याच्या प्रश्नावर चर्चा केली.

इथल्या भागाबद्दल माहिती देताना श्री. मोरे म्हणाले ''बोटोशी, कुर्लोद, कोचाळा, कारेगाव या ठिकाणी वनखात्याच्या जास्त जमिनी आहेत. कोचाळ्याला आता छोटेसे धरण पण होणार आहे. नाशेरा, आडोशी, शिरसगाव, कोचाळा या गावांमध्ये पाणी अडवता येऊ शकते. या भागात साधारणपणे होळीनंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवायला लागते. सरकारची गावतलाव योजना आता राबवली जाते. परंतु कधीकधी फार अडचणीची स्थिती होते. इथल्याच एका गावामध्ये मध्यवर्ती ठिकाणी गावातलावाची योजना राबवायची होती. पण शेतकरी जमीन देण्यास तयार होईना. त्यामुळे काम अडून राहिले आहे. गावतलावाची योजना राबवण्यासाठी माझ्यावर वरिष्ठांचा दबाव वाढत आहे.''

पिकांबद्दल बोलताना त्यांनी सांगितले, या भागात साधारणपणे ४०% नागली, ४०% भात आणि १०% कडधान्ये होतात. या भागात गवत जरी पिकत असलं तरी गवताची खरेदी मात्र होत नाही. लोक राबणीसाठी गवताचा वापर करतात. यंदा आसे बेरिस्ता भागात रोग पडल्याने पीक फारच कमी आले आहे.

इथले शेतकरी मुळा, पालक, मेथी यासारख्या भाज्यासुद्धा घेतात. वाकडपाड्याला एका शेतकऱ्याने पाणी पंप करून त्यावर यंदा कांदा पिकवला आहे.

तालुक्यातील ७०% लोक पावसाळ्याच्या सुरूवातीला शहापूर, भिंवडी, वाडा भागात भाताची लावणी करायला जातात. तिथं पैसे जास्त मिळतात. (५०-६० रू. रोज) तिथली कामे उरकल्यानंतर येऊन स्वतःच्या शेतात भाद्रपद महिन्यात लावणी करतात. त्यामुळे साहजिकच पिकं काही चांगली येऊ शकत नाहीत.

जंगल जमिनींबद्दल बोलताना श्री. मोरे म्हणाले ''बऱ्याच वर्षापूर्वी अतिक्रमण झालेली जमीन अजूनही लोकांच्या नावावर झालेली नाही. ती प्रकरणं न्यायालयात प्रलंबित आहेत. अजून वनखात्याच्या जमिनी महसूल खात्याकडे हस्तांतरित झालेल्या नाहीत. त्यामुळे लोकांना सात बाराचे

## मोखाडा, पेठ, सुरगाणा तालुक्यातील शेतीवर एक दृष्टिक्षेप

**मुख्य पिके** - भात, नागली वरई

**इतर पिके** - तूर, उडीद, चवळी, कुळीथ, भूईमूग व खुरासणी, (कारळे), गहू

**भाज्या** - वांगी, टोमॅटो, दोडका, घोसावळ, भोपळा, वाल पापडी, पालक, मेथी

**प्रतिएकर उत्पादन** - भात १० क्विंटल, नागली ५ क्विंटल, वरई ५ क्विंटल असे सरासरी उत्पादन होते मात्र गेल्या दोन तीन वर्षात कीड पडल्याने येणाऱ्या उत्पादनात घट झाली. यंदाच्या वर्षी १९९५-९६ मध्ये आलेले उत्पादन पुढीलप्रमाणे.

भात ५ क्विंटल, नागली २ क्विंटल, वरई २ क्विंटल.

**भाताच्या विभिन्न जाती :** इंद्रायणी, गुजरात ११, कर्जत, रत्ना पालघर, राजघोड्या, तायचेन, हरवी कोळपी, गरवी कोळपी, आरपी या जातीचा भात ४ महिन्यात तयार होतो. तर डांगी, तुक्या, महाडी, खडशी, धवळ प्रकारचा भात दोनच महिन्यात येतो.

अन्नधान्याच्या कमतरतेमुळे लोकांचा कल कमी वेळात येणाऱ्या जाती लावण्याकडे असतो. असा भात बैल पोळ्याच्या सुमारास तयार होतो. त्यामुळे अन्नधान्याचा प्रश्न सुटण्यास मदत होते.

खतांचा वापर अगदीच नगण्य होता. केवळ ओझरखेड (ता. पेठ) येथील शेतकऱ्याने भातासाठी युरिया वापरल्याचे सांगितले. जे शेतकरी विहीरीच्या पाण्यावर वांगी, टोमॅटो, गहू या सारखी पिके घेत होते ते आता खते वापरु लागले आहेत. कीटकनाशकांचा वापर देखील अत्यंत अल्प होता.

बागायतदार शेतकऱ्यांना खते, कीटकनाशकाबद्दलची माहिती नाशिकला मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांकडून मिळते. तर काही शेतकरी पिकावर रोग पडलेला दिसल्यास झाडाची पाने, खोड तोडून नेऊन दुकानातून कीटकनाशक आणताना आढळले.

**गवत :** जनावराना चरायला जंगलातच नेले जाते. तिथे भेल्या, बोंडल , बेर, कसवल, गौढा, कहांडोळ, तुरडा या प्रकारचे गवत जनावरांना उपलब्ध असते. उन्हाळ्यामध्ये भाताचं तणस (पेंढा) उडदाचं, तुरीच बरकल जनावरांना खायला दिले जाते.

**बियाणे** - तयार झालेल्या धान्यापैकी आवश्यक तेवढं चांगलं धान्य सागाच्या पानामध्ये बाधून छताला टांगून ठेवतात. पुढच्या वर्षी पेरणीसाठी त्याचा उपयोग केला जातो.

**धान्य साठवण :** धान्य साठवण्यासाठी बांबूपासून ताटकी आणि मुसकं तयार केले जाते. शेणानं आतून लिंपून घेतल्यावर सागाची पानं एकमेकांना जोडून आतून आवरण तयार केले जाते व मग धान्याची साठवण केली जाते. सागाच्या पानांनी झाकून ताटकी व मुसकीचे तोंड बंद करतात. ताटकीमध्ये ५००-६०० किलो मुसकीमध्ये १०० किलो धान्य मावू शकते.

**बैलाचे भाडे** - शेतीच्या कामासाठी १ बैल ४ महिन्यासाठी घेतला तर भाडे म्हणून २ ते ३ क्विंटल भात किंवा नागली द्यावी लागते. दिवसाला नांगर, बैलजोडी व गडी माणसाचे ३०-४० रुपये व १ जेवण असे भाडे आकारले जाते.

**मजुरी :** पावसाळ्यामध्ये १०-१५ रुपये रोख व १ जेवण असा मजुरीचा दर असतो मात्र घरामध्ये अन्नाचा तुटवडा असल्यास मजुरी धान्य स्वरुपात घेतली जाते. अशा वेळेस दिवसाला ३ किलो भात किंवा नागली व १ जेवण अशी मजुरी मिळते.

**विक्री किंमत :** आदिवासी भागात पोटापुरतेच पिकत असल्याने धान्य विकण्याचा प्रश्नच नसतो. मात्र अडीअडचणीच्या वेळेस आदिवासी विकास महामंडळासच धान्य विकले जाते. त्याचे दर पुढील प्रमाणे -

भात ५ रु./ कि. ,वरई ५ रु. / कि., खुरासणी १० रु. / कि.

उतारे देता येत नाहीत. लोक आजही दंडच भरत आहेत.''

दुपारी चार वाजता सूर्यमाळला गेलो. सूर्यमाळ हे तालुक्याचे दक्षिणेचे टोक तसेच थंड हवेचे ठिकाण. गावापासूनच पुढे तानसा अभयारण्य सुरू होते.

गावामध्ये मंगीबाई बुधा भरभुडे या ठाकर वृद्धेकडे गेलो. सत्तरीच्या घरात असलेली मंगीबाई हात, पाय मोडला असेल तर त्यावर पोटात घेण्यासाठी मधरा नावाच्या वनस्पतीची मूळं देते. एका पुडीला १० रूपये घेतले जातात. एका रूग्णाला तीन पुड्या दिल्या जातात त्यामुळे जखम आतून भरून येते असा मंगीबाईचा दावा आहे. घोडा, बकरी, कुत्रं यासारख्या जनावरांनासुद्धा हे औषध उपयोगी पडू शकते. या औषधाबद्दलचं ज्ञान मंगीबाईला तिच्या काका-काकूंकडून मिळालं, आता ती तिच्या मुलाला आणि नातवाला शिकवत आहे. तिच्याकडे ठाणे, भिवंडी, मुंबई या लांबच्या भागातून लोकं औषधासाठी येतात.

गावात महादेव कोळी, कातकरी, वारली तसेच बौद्ध समाजाचे लोक राहतात. गावामध्ये समाज मंदिर, मारूतीचं देऊळ, अंगणवाडी १ ली ते ७ वी पर्यंत आश्रमशाळा, वनखात्याचं विश्रामगृह प्राथमिक आरोग्य केंद्र (बंद अवस्थेत) आहे. तसेच न्युरो थेरपीचा खासगी दवाखाना आहे. दवाखान्यात मुंबईचे डॉक्टर महिन्यातून एका रविवारी येतात.

गावाजवळून तानसा अभयारण्य सुरू होतं. गेल्या दोन तीन वर्षांपासून हा भाग अभयारण्य म्हणून घोषित केला आहे. गावातली गुरं चरण्यासाठी जंगलात गेली तर दंडाची पावती फाडावी लागते. मागच्या वर्षी गावातली ३५-४० गुरं वाघानं मारून खाल्ली. जंगलाच्या हद्दीत वाघानं गुरं मारली तर नुकसानभरपाई मिळू शकत नाही. एखाद्याला नुकसानभरपाई मिळालीच तर फारच कमी मिळते. पण त्यासाठी खूप त्रास सोसावा लागतो.

संध्याकाळी ७ वाजता उधळे गावात पोहोचलो. गावातील रस्त्यावरचे दिवे लागलेले होते. आमची जीप गावात पोचल्यावर लहान मुलांचा घोळका जमा झाला. गावच्या महिला मंडळ प्रमुख नंदा ताईंच्या घरीच गावातील लोकांना घेऊन चर्चा सुरू झाली.

विशेष म्हणजे गावामध्ये नळपाणीपुरवठा योजना सुरू झाली आहे. गावाजवळच्याच विहिरीतले पाणी वापरले जाते. शेतीसाठी पण भरपूर पाणी उपलब्ध आहे. मात्र ते उचलून जमिनीला कसं द्यायचं हाच एक मोठा प्रश्न आहे. दुसरं पीक घ्यायचं म्हटलं तर मोकाट गुरांचा त्रास होतो. गावामध्ये पैसा असता तर गावात खूप काही सुधारणा झाली असती असाही एक सूर आढळला.

महिला मंडळाबाबत बोलताना नंदाताई म्हणाल्या ''जोगलवाडीच्या कमलताईंमुळे गावात मंडळ सुरू झालं आहे. गावातल्या बायकांनी एकत्र येऊन बचत गट महिन्यापूर्वीच सुरू केला आहे. ७० बायकांचे मिळून ३५० रूपये जमले आहेत. ४० किलो नागलीसुद्धा ठेवायला दिली आहे. महिलांनी मिळून काहीतरी करावं असं कमलताई म्हणत होत्या, किंवा खोच गावासारखं बायकांनी 'राशन' दुकान चालवावं. पण हे सगळं पैशाचं काम असल्याने काम करणाऱ्या बायकांना लिहिता-वाचता तर आलं पाहिजे. नाहीतर दहा हजार घ्यायचे आणि पाच हजाराची फूटतूट यायची. त्याच्यासाठी दहा-बारा बायकांची तयारी पाहिजे त्यातल्या कमीत कमी पाच तरी हुशार पाहिजेत. तसा संसाराचाच उद्योग भारी आहे.''

जंगलाबद्दल माहिती देताना नंदाताईंनी सांगितलं. जंगल इथून फारच लांब आहे. त्यामुळं आता फारसं कोणी जात नाही. फाटीसाठी (सरपण) सकाळी ८-९ वाजता निघालं तर संध्याकाळी ४-५ वाजता एक मोळी घेऊन परत येऊ शकतो. असा आमचा दर दिवसाआडचा उद्योग असतो. स्वत:च्या मालकीचं झाड तोडून ठेवायचं. पावसाळ्यामध्ये लागणारे लाकूड आत्ताच गोळा करावे लागते.

जंगलामध्ये आता फारसं काही राहिलेलं नाही. पूर्वी गावातली लोकं करवंद गोळा करून ईगतपुरी, कसारा, कल्याणला रेल्वे स्टेशनवर विकायची. पण आता परवडत



नाही. बसचं यायचं-जायचंच भाडं खूप होतं. ईगतपुरीला चालत जायचं म्हटलं तर चार तास लागतात. तिथं खाण्यापिण्याचा खर्च थोड्याफार प्रमाणात होतोच त्यामुळे फारसे पैसे सुटत नाहीत.

इथले कातकरी लोक कधी कधी डिंक, धोतरा बी, दवणा, बाफळी वगैरे विकण्यासाठी गोळा करून आणतात. ती लोकं जंगलात वस्तू गोळा करायला गेली की एक-एक, दोन-दोन दिवस येत नाहीत. भाकरीसुद्धा बरोबर घेऊन जातात.

तिथंच श्री. खोडे यांची भेट झाली. ते राष्ट्रीय कलापथकामध्ये काम करतात. एकंदर नऊ जण आहेत. कलापथकाचा मूळ उद्देश अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, प्रौढ शिक्षण, लोकांची उन्नती यासारख्या विषयावर समाज प्रबोधन करणे हा आहे. १९८८ सालापासून सुरु असलेल्या कलापथकाने आजपर्यंत महाराष्ट्रातल्या सर्व आदिवासी भागामध्ये आपले कार्यक्रम सादर केले आहेत. त्यांनी उदाहरणादाखल व्यसनमुक्तीवरचे गाणे गाऊन दाखवले.

श्री. खोडे यांनी गायलेल्या गाण्याचे सूर मनामध्ये घोळवतच खोडाळा विश्रामगृहाकडे परतलो.

**गुरुवार** **२२ फेब्रुवारी १९९६**

खोडाळ्याकडून मोखाड्याला जाताना देवबांधच्या पुढे डाव्या बाजूला फाटा फुटतो तिथून तीन कि. मी. वर आडोशी गाव. आडोशीचा रस्ता देवबांध नदीच्या कडेकडेनेच आहे. नदीवर पाणी अडवण्यासाठी पाच बंधारे घातलेले होते पण नदीचं पात्र कोरडं ठणठणीत. बंधाऱ्याच्या दारांचा पत्ता नव्हता. तसेच दोन बंधाऱ्यांच्या भिंतीचा काही भाग पाण्याच्या वेगाने? वाहून गेला होता.

गाव तसं नेहमीसारखंच. महादेव कोळी, वारली या मुख्य जमाती, बुद्धांची पण ५-६ घरं. गावात फेरफटका मारला असता बरीचशी घरं बंदच असल्याचे आढळले. ७०-७५% टक्के माणसं काम धंद्यासाठी भिवंडी, वाडा भागात गेली होती. दिवाळीनंतर गेलेली माणसं होळी, लग्नसराईच्या निमित्ताने हळूहळू परतायला लागली होती.

गावात नजरेत भरलं ते फक्त एकच दुमजली मोठं घर, विटांनी बांधलेलं, दगडी भिंतीचे कुंपण असलेलं. घरापुढे M80 ही दूचाकी दिमाखात उभी होती. त्याच्याभोवती वारल्यांची कुडाची घरं विखुरलेली. ही विसंगती एकदम नजरेत भरली. अधिक चौकशी केली असता कळलं ते घर होतं 'सेक्रेटरीचं.' सेक्रेटरी म्हणजे ग्रामसेवक. शेती इतरांसारखीच ४-५ एकर. शेतीचे उत्पन्नसुद्धा फार काही नव्हतं. तो याच गावचा, दुसरीकडे 'सेक्रेटरी' म्हणून काम करता होता आणि मग संपूर्ण कोड्याचा उलगडा झाला.

आम्ही श्री. गांगुर्डे यांच्या घरी बसलो होतो. गावात त्यांचं धरून बौद्धांची सहा घरं. पाण्याचा विषय आपसूकच निघाला. गावामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी एकच विहीर आहे. पाणी आटल्यावर, होळीनंतर एक दीड महिना टँकरने पाणीपुरवठा होतो. गावामध्ये पाणी उपलब्ध झालं तर १० पैकी ५ तरी लोकं दुसरं पीक घेतील असं लोकांनी सांगितलं. श्री. गांगुर्डे यांच्याकडे ९ एकर जमिनीचा एक पट्टा आहे. चारही बाजूने नदीचा गरका आहे. ''अर्ज झाले, विनंत्या झाला, अनेक हेलपाटे घालून झाले, बऱ्याच जणांना भेटलो, पंप मागता मागता मरायला आलो. आज माझं वय पासष्ट आहे तरी अजून पंप मिळाला नाही. त्यांना काय पाहिजे तेच समजत नाही.'' श्री. गांगुर्डे यांनी खंत व्यक्त केली.

त्यांची बायको महिला मंडळ अध्यक्ष. म्हातारा-म्हातारीची दोन मुलं कल्याणला राहतात. नातवंडं मात्र यांच्याकडेच सांभाळायला ठेवली आहेत. घरची २५-३० एकर शेती आहे.

७-८ कोंबड्या, १०-१५ गुरं आणि ५-६ मुलं सांभाळायलाच आम्हाला इथं ठेवलंय असं म्हातारा सांगत होता. मात्र मुंबईतील गर्दी गोंगाटापेक्षा इथं खूपच बरं वाटतं असं मतही त्याने व्यक्त केले.

म्हातारी पण बरीच बोलकी होती. सोन्याचं कानातलं, कंबरेला चांदीचा कमरपट्ट्या, हातापायाच्या नखांना नेलपॉलिश, नॉयलॉनचं नऊवारी पातळ अशी तिची वेशभूषा.

आपल्या तिसऱ्या मुलाची कैफियत मांडताना ती म्हणाली ''लग्न होऊन दोन-चार वर्ष झाली. 'पठाणासारखा' पोरगा हाये पण त्याला अजून एक बी पोर न्हाय.''

त्यांची मुलगी त्यांच्याबरोबरच राहते. घरातच गावातल्या मुलांसाठी अंगणवाडी चालवते. दिसायला तरुण, सुंदर, लग्नानंतर काही वर्षातच वैधव्य आलं. तिनं तिच्या मुलीचं चौदाव्या वर्षीच लग्न लावून दिलं. सामाजिक असुरक्षिततेमुळे वयात आलेली पोर घरात ठेवायची म्हणजे धोक्याचेच. कायद्याने लहान वयात लग्न करणे गुन्हा आहे हे माहीत असूनही नाईलाजाने मुलीचे लग्न केले. ही गोष्ट गावाकडच्या समाजव्यवस्थेवर प्रकाश टाकणारी आहे.

गावामध्ये १५० महिलांनी मिळून बचत गट स्थापन केला आहे. एकूण १००० रूपये जमवले पण या पैशाचं काय करायचं असा प्रश्न पडल्याने पैसे साध्या बँकेतच पडून आहेत. अध्यक्ष बाईचं म्हणणं असं की ही सगळी (आदिवासी लोकं) ''कंगाल पार्टी'' आहे. सुरूवातीचे एक दोन महिने पैसे जमवले पण नंतर गोळाच झाले नाहीत.

गावामध्ये दारू पिणाऱ्यांचं प्रमाण खूप जास्त आहे. जवळ जवळ निम्म्याच्या वर लोकं दारू पितात. खायला नसलं तरी पित असतात असं एक मत. सहाजिकच त्यामुळे भांडण तंटे, बायका मुलांना मारहाण हे प्रकारही चालूच असतात. यावर गावातल्या महिलांनीच लढा द्यायचे ठरवले आहे.

दारूबंदी करण्यासाठी महिन्यापूर्वीच गावातल्या दारूभट्ट्या त्यांनी उध्वस्त करुन टाकल्या. मात्र गावातला पुढारीच लोकांना फूस लावतो व दारू गाळायला सांगतो अशी अध्यक्षबाईंची तक्रार. ''मात्र आम्ही हार जाणार नाही.

गावामध्ये दारू गाळणे बंद करू'' असा आत्मविश्वासही बोलताना व्यक्त केला.

नदीवरच्या बंधाऱ्यांच्या स्थितीबद्दल विचारले असता लोकांनी सांगितलं की कंत्राटदार निकृष्ट माल वापरत असल्याने पावसाळ्यामध्ये पाण्याचा दाब भिंतीवर पडल्याने बंधारा वाहून जातो. दुसरं म्हणजे पाया खणताना ब्लास्टिंग करत असल्याने बंधाऱ्याखालच्या खडकाला भेगा पडतात. त्यामुळे पाणी सगळे भेगांमधून वाहून जाते. यावर उपाय म्हणून बंधारा खोदताना पाया 'अलवर' (हळूवारपणे) खणून, खोदून घेतला पाहिजे व नंतर 'पॅक' केला पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे पावसाळा संपत आला तरी बंधाऱ्याची 'गेटं' लावत नाहीत त्यामुळेही पाणी साठत नाही. सध्या ती दारं कुठं आहेत विचारले असता संजय या तरुणाने गावाबाहेर असलेल्या घराकडे बोट दाखवलं-बंधाऱ्याच्या आठ लोखंडी दारांचा वापर गावच्या पुढाऱ्याने अत्यंत कुशलतेने आपल्या घराला कुंपण घालण्यासाठी करून घेतला होता.

येताना देवबांधच्या सह्याद्री आदिवासी बहुविध सेवासंघ या संघ परिवारातर्फे चालवल्या जाणाऱ्या संस्थेत थांबलो होतो. या संस्थेमार्फत अनेक उपक्रम राबवले जातात.

आदिवासी लोकांसाठी दर रविवारी दवाखाना चालवला जातो. मुंबईकडचे डॉक्टर या दवाखान्यासाठी आपली सेवा उपलब्ध करून देतात. १२ ते ५ वेळात चालवल्या जाणाऱ्या या दवाखान्यात आसपासचे आदिवासी रूग्ण औषधोपचारासाठी येतात. त्यांच्याकडून नाममात्र २ रूपये शुल्कापोटी घेतले जातात.

संस्थेने २५ आदिवासी मुलांसाठी वसतीगृहाची सोय केली आहे. ही मुले शाळेसाठी खोडाळ्याला जातात.

औषधी वनस्पतींच्या लागवडीचा प्रकल्प देखील हाती घेण्यात आला आहे. संस्थेतर्फे देवबांध नदीवर कच्चा बंधारा घालून पाणी अडवण्यात आले आहे. साठलेल्या पाण्यावर भाजीपाला केला जातो. इथेच गोशाळासुद्धा चालवली जाते.

## जंगल उत्पादन

आदिवासी आणि जंगल यांचे नाते सर्वपरिचितच आहे. दैनंदिन जीवन जगण्यासाठी अजूनही आदिवासींना जंगलाचाच आधार आहे.

जळणासाठी अनेक प्रकारचे लाकूड वापरले जाते. धामोडा, सादडा, हेद, कळम झाडांचे लाकूड 'दम धरून पेटते' तर पांगारा, सावर, पळस लवकर जळते. 'शिसवाचे लाकूड' चांगलं तेलासारखं पेटतं. घरबांधणीसाठी साग, आईन, हेद झाडांच्या लाकडाचा वापर घराचे वासे तयार करण्यासाठी होतो तर कारवीच्या भिंती बांधल्या जातात. कारवी दर पाच ते सात वर्षांने तयार होते. त्यामुळे ज्यावेळेस बहर येईल त्यावेळेस कारवी तोडून आणून घराची पुनर्बांधणी करणे हा आदिवासींच्या जीवनातील एक भागच आहे. कारवी विकत घ्यायची झाल्यास १५ रूपयाला एक भारा मिळतो. आणि सर्व साधारणपणे एका घराला १० ते १२ भारे लागतात.

घरातील लाकडी वस्तू बनवण्यासाठी कळम वृक्षाचे, नांगरासाठी तिवस वृक्षाचे तर बैलगाडी बनवण्यासाठी खैराचे लाकूड वापरले जाते.

भाद्रपद महिन्यामध्ये कडूकंद, वाजकंद, कुर्डु, लोथ, दिंड, साईचा वेल, तेरा, माठ, कुंब यासारख्या भाज्या जंगलातून आणून खाल्ल्या जातात. या व्यतिरिक्त आळव, सागाचं बी, टेंभुर्णीची पानं, अंबाडी, दगडी देखील जंगलातून गोळा केले जाते. डिंक, दवणा, हिरडा, बाफळी, करवंद, जांभूळ यासारखी जंगलोत्पादने विकून आदिवासींना थोडीफार रोख रक्कम मिळते.

पुण्या-मुंबईकडचे बरेचसे पांढरपेशा वर्गातील लोक इथे निवृत्त झाल्यानंतर स्वयंसेवक म्हणून काम करतात. संस्थेचा सर्व कारभार देणग्यांवरच चालतो.

**शुक्रवार** **२३ फेब्रुवारी १९९६**

सकाळी १० वाजता सूर्यमाळ गावाचा सखोल अभ्यास करण्यासाठी तिथं जाऊन पोहोचलो. गावामधल्या १५ लोकांची छोटीशी सभा घेतली. गावाची माहिती तसेच लोकांच्या समस्या जाणून घेतल्या.

रामदास गोविंद हमरे, महादेव कोळी असलेल्या या माणसाशी बऱ्याच गप्पा झाल्या. त्यांनी या वर्षी स्वतःच्या जमिनीतील सागाची झाडं विकायला काढली आहेत. झाडांच्या विक्रीची प्रक्रिया फार गुंतागुंतीची आहे. आधी वनखात्यात जाऊन जी झाडं तोडायची आहेत त्यावर छापणी करून घ्यावी लागते. म्हणजे क्रमांक टाकावे लागतात. त्यानंतर ती झाडं तोडून सरकारी गोदामात जमा केली जातात. नंतर तोडलेल्या लाकडाचा लिलाव होतो. आणि मग पैसे मिळतात. ही पद्धत वाटते तितकी सोपी नाही; कारण सरकारी अधिकारी पैसे मागतात. अशा गोष्टींमध्ये पन्नास-साठ हजार सहज द्यावे लागतात. एवढे पैसे एकरकमी अथवा थोडे थोडे करून सुद्धा देणे परवडू शकत नाही, म्हणून हीं झाडं ठेकेदारामार्फत तोडली जाणार आहेत. एकूण १५० बुडांचे (झाडांचे) एक लाख पाच हजार रूपये मिळणार आहेत. ठेकेदाराने २०,००० रूपये आगाऊ रक्कम म्हणून दिली आहे. मात्र सरकारी मार्गाने याच झाडांची किंमत तीन लाखाच्या आसपास झाली असती, मात्र अधिकाऱ्यांच्या कटकटीमुळे त्या मार्गाने जावेसेच वाटत नाही.

शेतीच्या कामांची रामदासभाऊंनी सविस्तरपणे माहिती दिली. साधारणपणे जानेवारी फेब्रुवारी महिन्यात शिंदाड तोडणीला सुरूवात होते. स्वतःच्या मालकीच्या असलेल्या झाडांच्याच केवळ फांद्या तोडल्या जातात. पडीक जमिनीतील गवतदेखील कापलं जातं. गवत, तोडलेल्या फांद्या जिथं राब करायचा तिथं एकावर एक असे थर रचले जातात. मार्च महिन्यामध्ये हे सर्व पेटवून दिले जाते. नवीन पिकाच्या रोपट्यांसाठी जमीन तयार करणे हाच यामागचा उद्देश असतो. टाळे तोडायचं काम पुरूष, तर गोळा करून वाहून नेण्याचे काम स्त्रिया करतात.

मे महिन्यामध्ये शेतावरच्या बांधांची दुरूस्ती केली जाते, मातीकाम करून ठेवले जाते.

जून महिन्यात पेरणी तसेच पहिला पाऊस पडल्यावर जमिनीची नांगरणी होते. राब केलेल्या जागेवरचं पीक जेव्हा नीट उगवून येतं त्यानंतर आवनी (लावणी) केली जाते. आवनी झाल्यानंतर मेरं (भोकं) बुजवणे, निंदणी करणे यासारखी कामे केली जातात. सर्वप्रथम हळवा भात तयार होतो; त्यानंतर गरवा भात, नागली, वरई याप्रमाणे पिकांची कापणी केली जाते. ऑक्टोबरपासून मळणीच्या कामाला सुरूवात होते. त्यासाठी शेतामध्ये जमीन ठाकून ठोकून सपाट बनवून शेणाने सारवली जाते. मळणीचे काम डिसेंबर-जानेवारीपर्यंत चालते.

इथली लोकं खाण्यासाठी खुरासणी किंवा मोवटीचे (मोहाची फळे) तेल वापरतात. ४ पायली खुरासणीपासून साधारणपणे ३ किलो तेल निघते.

रामदास हमरे यांची मुलाखत झाल्यानंतर गावातल्या आठ-दहा कुटुंबांकडून त्यांच्या आर्थिक परिस्थितीबाबत माहिती गोळा केली.

सूर्यमाळ गावाला केवनाळा हा एकच पाडा आहे. मुख्य गावाच्या थोडेसे बाहेर कातकरी पाडा आहे. एकंदर २५ घरं असलेला पाडा खासगी जमिनीवर वसलेला आहे. पाड्यामधली बहुतेक सगळी घरं बंदच होती. सर्व कातकरी कुटुंबे भिवंडी-वाडा भागात वीट भट्टीवर कामाला गेली होती. पावसाळ्यानंतर बाहेर पडल्यावर मे महिन्याच्या अखेरीस परततात. फक्त तीन घरातून माणसे भेटली.

त्र्यंबक वाघ हा ७० वर्षाचा म्हातारा त्याच्या खोपटाच्या बाहेर बसून होता. त्याची तीनही मुलं आपल्या कुटुंबासहित वीट भट्टीच्या कामावर गेली होती. त्याने दवणा गोळा करून ठेवला होता. गावात दवणा विकला तर १० रूपये तर खोडाळ्याला १५ रूपये मिळतात. किरकोळ काहीतरी गोळा

करून आणून विकणे यावरच तो गुजराण करत होता.

गावामध्ये तीन विहिरी आहेत. एका विहिरीजवळ जमिनीतूनच पाणी हळूहळू बाहेर येताना दिसले. पाणी बाराही महिने मुबलक असते. गावामध्ये नळपाणीपुरवठा योजना सुरू झाली होती पण आत्ता बंद पडली आहे. कारण सांगताना गावकरी म्हणाले "गावाबाहेरच्या विहिरीवर ३ हॉर्स पॉवरचा पंप आहे. पंपिंग करायला व टाकी भरायला बारा तास लागायचे तर रिकामी व्हायला केवळ एकच तास पुरायचा अधिक क्षमतेचा पंप बसवल्यासच पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकेल."

**शनिवार** **२४ फेब्रुवारी १९९६**

सकाळी अचानक खूप दाट धुके पडले होते. १० फुटावरचे दिसणे देखील मुश्कील होऊन बसले होते. नाश्त्याला विमलताईंकडे गेलो होतो त्यांनी गरमागरम वरईचे तांदूळ त्यावर तुरीचे वरण असा छान बेत केला होता. त्याची चव दिवसभर जीभेवर रेंगाळत होती.

सूर्यमाळहून परतल्यावर खोडाळ्याच्या आठवडे बाजारात फेरफटका मारला. कापड, भांडी विक्रेत्यांनी आपाआपली दुकाने थाटली होती. सुकट तसेच निरनिराळ्या प्रकारचे ताजे नदीतले मासे आदिवासींनी विकायला आणले होते. हळद, तिखट, मसाला तसेच बाजरीचे पीठ देखील विकायला होते. वांगी, कांदा, टोमॅटो, बटाटा, घेवडा, कोथिंबीर यासारख्या भाज्या तसेच द्रांक्ष, पेरू, कलिंगड, बोरं, केळी, संत्र-मोसंबी ही फळेसुद्धा विकायला होती. बाजार अगदी माणसांनी फुलून गेला होता.

दुपारी आडोशीच्या श्री. बाळू पाटील यांची भेट घेण्यासाठी पुन्हा तिथं गेलो.

श्री. बाळू पाटील हे पंचायत समितीचे माजी सभापती. तालुक्याच्या राजकारणाचा दांडगा अनुभव. गावाच्या अलिकडेच त्यांचं स्वत:चं बैठं घर, एक टेम्पो ट्रॅक्स, भाताची गिरणी, घराच्या जवळच रयत शिक्षण संस्थेच्या आश्रम शाळेला जागा दिली आहे.

परिचय करून दिल्यानंतर गप्पांना सुरूवात झाली. विकासाबद्दल बोलताना त्यांनी ईगतपुरी तालुक्याचे उदाहरण दिले. "तिथे वचन संस्था काम करते, त्यांनी लोकांना हरप्रकारे मदत केली आहे. पाणी प्रकल्प केले. त्यावर भाजीपाला, फळझाडांची लागवड केली. तिथं लोक आता स्ट्रॉबेरीसुद्धा घ्यायला लागले आहेत. त्यांना मुंबईचं 'मार्केट' जवळ आहे. त्यामुळे मालाला चांगला उठाव असतो.

मोखाडा तालुक्यात मात्र तसे नाही. इथली बरीचशी जमीन नापीक आहे. इथं पाऊस खूप पडतो. मात्र डोंगराळ प्रवेश असल्यानं पाणी लगेच वाहून जातं, साठू शकत नाही. त्यामुळे पावसाळ्यानंतर पोटापाण्यासाठी गावंच्या गावं ओस पडतात. ७० ते ७५ टक्के लोक बाहेरगावी जातात. इथं आर्थिक व्यवहारांना 'नो चान्स'. इतर बहुजन समाज साधारणपणे वर्षातले ८ महिने बाहेर असतो. पाऊस पडल्यावर ते परत येतात. त्यामानाने इथं जो सुशिक्षित समाज आहे ज्यांचे 'व्यवहार उंच आहेत' त्यांची परिस्थिती चांगली आहे.

गावामध्ये मार्चपासून टँकरला सुरूवात होते. गावासाठी १९८० सालीच पाणीयोजना मंजूर झाली आहे. जमीनदेखील वर्ग केली गेली पण त्यापुढं अजून काही हालचाल झालेली नाही." देवबांध नदीवर असलेल्या बंधाऱ्यांच्या शोचनीय अवस्थेबद्दल विचारले असता ते म्हणाले, "बंधाऱ्याची उंची ३ मीटर असते. मात्र इथल्या टेकड्यांचा भाग बराच उतरता आहे. त्यामुळे वहात येणाऱ्या पाण्याला वेग खूप असतो. तसेच दीड मीटर खोल फाऊंडेशन घ्यायच्या ऐवजी खडक लागला की बांधकाम सुरू करतात. त्यामुळे पाण्याचा लोड बांधकामावर येतो व त्यातून बंधारा वाहून जाण्याचे प्रकार घडतात. कधी कधी पाया खोदताना ब्लास्टिंग केले जाते. त्यामुळे खडकाला आतल्या बाजूला भेगा पडतात व त्यातून पाणी झिरपत रहाते, बंधाऱ्यात साठू शकत नाही. यावर उपाय म्हणजे खडकावर सिमेंटचं पाणी टाकले पाहिजे म्हणजे पाणी झिरपणार नाही.

जवळच्या नाशेरा गावातली १ लाखाची योजना कित्येक

वर्ष अपूर्णच आहे. योजना पूर्ण होईल, या भागात पाणी येईल या आशेने आम्ही विजेचा पंप, पाईप सर्व काही घेऊन ठेवले, जवळजवळ लाख रूपये त्यासाठी खर्च केले. पाणी मिळालं असतं तर १०० पोती गहू सहज पिकला असता. पण पदरी निराशा आली. या दिरंगाईमुळेच माझ्या थोरल्या मुलाने शेती बघणे सोडून देऊन आता ठेकेदारी सुरू केली आहे.

इथल्या भागामध्ये हरभरा, कांदा, गहू सर्व काही येतं मात्र उसाट (मोकाट) गुरांमुळे फार त्रास होतो. आदिवासी शेतकरी आंबा, जांभूळ, रामफळ, सीताफळ, चिक्कू यासारख्या फळझाडांची लागवड करतात मात्र त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत.''

भ्रष्टाचाराबद्दल बोलताना श्री. पाटील म्हणाले ''आदिवासींना ८००० रू. बैलजोडीसाठी मिळतात. त्यापैकी ५००० रू. चे बैल घेतले जातात आणि ३००० रू. खाल्ले जातात. याऐवजी जर १००० रूपयेच खाल्ले आणि २००० रू. आदिवासींना दिले तरी तो खूष होईल. पैसे किती खायचे, गोरगरीबांना किती लुबाडायचं याला सीमाच राहिलेली नाही.

आदिवासींची परिस्थिती हळूहळू सुधारत चालली आहे. पूर्वी सर्वजण लंगोटी लावून फिरायचे, तालुक्याच्या गावी गेल्यावर बाचक्यातून कळकट मळकट कपडे काढून अंगावर चढवायचे एवढी यांची गरीबीची परिस्थिती होती. त्याकाळी आरोग्याच्या सुविधादेखील फारशा उपलब्ध नव्हत्या. शरीराने काटक असलेली ही लोकं कोणी आजारी पडल्यावर डोली करून दहा-दहा किलोमीटर चालत जाऊन दवाखान्यात पोचवायचे. आता इथे आरोग्याच्या सोयीसुविधा वाढल्या. ठिकठिकाणी आश्रमशाळा उघडल्या गेल्याने शिक्षणाचा प्रसार वाढत चालला आहे. आदिवासी मुलं शिकून आता पुढं यायला लागली आहेत.''

**रविवार** **२५ फेब्रुवारी १९९६**

गेल्या आठवड्यात केलेल्या कामाची सविस्तर टिपणं काढण्यासाठी, केलेल्या कामाचा आढावा घेऊन पुढची दिशा ठरवण्यासाठी विश्रामगृहावरच थांबलो होतो. दुपारी सूर्यमाळला काम करणाऱ्या ग्रामसेवकाला भेटलो. त्याने इंदिरा आवास योजना, जवाहर रोजगार योजना, आय.आर.डी.पी. यासारख्या अनेक योजनांची माहिती दिली. या योजनांचा लाभ बऱ्याच आदिवासींना होत आहे. मात्र विशेष गोष्ट म्हणजे १९७१ च्या आकडेवारीनुसार दारिद्रय रेषेखाली नोंदल्या गेलेल्या कुटुंबांनाच हा लाभ मिळत आहे. त्यानंतर आजपर्यंत एकही सर्वेक्षण झालेले नाही, की नवीन यादी तयार केली गेली नाही. उदरनिर्वाह करता यावा म्हणून आदिवासींना १० बकऱ्या व एक बोकड अशा संचासाठी कर्ज मिळतं. बकरीपालनातून चांगलं उत्पन्नही मिळतं. पण लोकं त्याचा गैरफायदा घेतात. दुसऱ्याच्या बकऱ्या घ्यायच्या त्याला पाच पन्नास रूपये द्यायचे अन् त्याच बकऱ्या खरेदी केल्या म्हणून दाखवायचं. तर कधीकधी बिल्ले मारलेल्या बकऱ्या मारून खायच्या आणि बिल्ले सांभाळून ठेवायचे व बकऱ्या आजाराने मेल्या म्हणून सांगायचे. अधिकारी कोण बघायला येतो? दिलेलं कर्ज वसूल करण्यासाठी अधिकारी २-३ हेलपाटे मारतो. आदिवासींच्या घरामध्ये जप्तीसाठी काही मालमत्ता नसते. शेवटी कर्ज माफ केलं जातं. असे प्रकार चालू आहेत. आदिवासींनी दारु प्यायचे सोडून दिलं व नीटपणे बकरी पालन केलं तर एका बकरी पासून ३००० रूपयापर्यंत उत्पन्न मिळू शकेल.

**सोमवार** **२६ फेब्रुवारी १९९६**

मोखाडा तालुक्याच्या दक्षिण भागातील अभ्यास संपवून आम्ही आमचा मुक्काम खोडाळ्याहून मोखाड्याच्या विश्रामगृहात हलवला.

बेरिस्ता आणि आसपासच्या पाड्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी आम्ही निघालो.

सर्वप्रथम उंबरपाडा येथे गेलो. तिथल्या शाळेला भेट दिली, शिक्षकांशी चर्चा केली. बेरिस्ता गावठाण व तेलउंबर पाड्यामध्ये माहिती घेऊन परत मोखाड्याला आलो.

दुपारी ४ वाजता कळमपाडा या दरीमध्ये वसलेल्या गावाला जाऊन पोहोचलो. गावामध्ये एकूण ८०-८५ घरं. काही घरं दुमजली, दगडाचे जोतं बांधून त्यावर विटांनी बांधलेली तर काही अगदीच ज्वारी/कारवीनं बांधलेली. दगडावर, जोत्यावर नक्षी तसेच दारांवरही बऱ्यापैकी कलाकुसर केलेली होती. गावामध्ये कोकणा व वारली या दोनच जमाती. बहुसंख्य वारली कुटुंब भूमिहीन होती, काहींनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण केलेलं.

शिवराम भोये यांच्या घरी आमची छोटीशी ग्रामसभा सुरू झाली. नॅन्सी ताईंनी प्रास्ताविक केलं आणि नंतर लोकांना त्यांच्या समस्यांबद्दल प्रश्न विचारायला सुरूवात केली. पण अपेक्षित उत्तरं मिळेनात. लोकं काहीतरी हातचं राखून बोलत असल्याचं जाणवत होतं.

नंतर बोलता बोलता एकदम खुलासा झाला, ते गाव कष्टकरी संघटनेचं होतं. प्रदीप प्रभू नेहमी तिथं येत असतात. लोकांना आमच्याविषयी संशय आला होता. कुठलं, कोण कोणीतरी जीपमध्ये बसून येतं आणि प्रश्न विचारायला लागतं. हे कुठल्या पक्षाचे प्रचारक तर नाहीत ना? गावामध्ये ही लोकं कशासाठी आली असतील ? त्यांना आपल्याकडून काय पाहिजे असेल? अशा नानाविध शंका कुशंका त्यांच्या मनात येऊ लागल्या. नॅन्सीताईंची आणि प्रदीप प्रभूंची ओळख असल्याने, सभा, संमेलनांचे संदर्भ दिले गेल्याने कोंडी फुटण्यास मदत झाली. आणि नंतर मनमोकळेपणाने गप्पा सुरू झाल्या.

गाव तसं चळवळ करणाऱ्यांचं. काही महिन्यापूर्वी गावामध्ये देवळावरून वाद झाला होता. लोकांनी त्यांच्यावर पोलिसांकडून होत असलेल्या अन्यायाविरूद्ध पोलिस स्टेशनवर, तर रोजगार हमी योजनेच्या कामांना मंजुरी मिळूनही काम सुरु झालं नाही म्हणून तहसिलदार कचेरीवर मोर्चा नेला होता.

गावच्या प्रश्नांवर चर्चा सुरू झाली. चर्चा सुरू असताना मध्येच देवराम येऊन बसला अन् कायमचाच लक्षात राहिला. खाकी पँट, पीळदार शरीरयष्टी, वाढलेले केस, गांधी टोपी.

## स्थलांतर

आदिवासी भागातील सर्वात मोठी समस्या.

५०-७०% कुटुंबातून एक किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती स्थलांतर करतात.

**ठिकाण** - वाडीवऱ्हा, भिवंडी, बोईसर, ठाणे, वाडा, नाशिक, पिंपळगाव, धरमपूर, वापी, बलसाड.

**कालावधी** - दिवाळीनंतर नोव्हेंबरपासून मार्चपर्यंत होळी, लग्नसराईसाठी परत येतात. पुन्हा गेल्यावर पावसाळ्याची आधी गावात परततात.

सलग २-३ महिने रहातात किंवा १५-२० दिवसांच्या ३-४ खेपा मारतात.

**रहाणीमान** - सर्व कुटुंबाच्या कुटुंब इंधन आणि शिधा घेऊन कामाच्या ठिकाणी स्थलांतर करतात. झाडाखाली, रस्त्याच्या कडेला किंवा तात्पुरत्या बांधलेल्या झोपड्यातून रहातात.

**कामाचे स्वरूप आणि मजुरी**

| | |
|---|---|
| इमारतीचे बांधकाम | ५०-७० रू. / दिन |
| मातीकाम, खोदकाम | ४०-६० रू. / दिन |
| शेती, मळ्यावरचे काम | ३५-४० रू. / दिन |

वीट भट्टी - दर हजार विटांना १०० रू. (एका कुटुंबाला) किंवा ३० रू. / दिन

**गुजरात राज्य**

मासेमारी जंगलतोड,<br>मीठ तयार करणे : } ५० रू. /दिन

मोखाडा तालुक्यातील १४ पैकी ६ कुटुंबातून तर पेठ, सुरगाणा तालुक्यातील ११ पैकी ८ कुटुंबांना किमान एका व्यक्तीने अर्थार्जनासाठी स्थलांतर केल्याचे आढळून आले.

आमची काय चर्चा चालली आहे ते नीटपणे ऐकू लागला पण शिवराम काकांनी त्याला शर्ट घालून येण्याबद्दल नजरेने खुणावले. पण त्याचे लक्ष नव्हते. शेवटी त्यांनी त्याच्याजवळ जाऊन शर्ट घालून येण्यास सांगितले.

गांवातल्या स्थलांतराविषयी बोलताना शिवराम काका म्हणाले ''यंदा गावातून ८४ लोकं वाडीव्हरा, ठाणे इथं गेली आहेत. घरात फक्त म्हातारी कोतारी अन् लहान मुलं तेवढी राहतात. तिकडं जाऊन खड्डे खोदणं, माती, वाळू ट्रकमध्ये भरणे अशी कामं केली जातात. काम अंगावर घेतलं (ठेकेदारीनं) तर दिवसाला ५० ते ६० रूपये मजुरी मिळते. तिकडे उघड्यावरच रहावं लागतं, जाताना स्वयंपाकासाठी शिधा, लाकूडफाटा सगळं बरोबर घेऊन जायचं, पंधरा दिवस रहायचं आणि परत यायचं. कामाच्या ठिकाणी खाण्यावर, कपड्यावर खर्च करायला परवडतच नाही.''

रात्री गावामध्ये लग्नाची वरात आली. त्यामुळे सर्वजण दारू पिऊन नाचण्यात दंग झाले होते. नवरा व नवरीला खांद्यावर घेऊन नाचवले जात होते.

लग्नाची वरात बघून परतल्यानंतर देवराम बरोबर गप्पा मारत बसलो. तो ग्रामपंचायत सदस्य आहे. त्याचे गावात छोटेसे किराणा मालाचे दुकान आहे. त्याने सांगितले ''आदिवासी अजूनही मागासलेला आहे. सरकार त्यांच्या सोयीसुविधांसाठी अनेक योजना आखते, पण त्या आमच्यापर्यंत पोहोचतच नाहीत. सरकारी अधिकारी जिथं सोय नसते, लक्ष घालायला पाहिजे तिथं लक्ष घालत नाहीत, अन् नको तिथं लक्ष घालतात''

देवरामनं शहरी भागाबद्दल बरीच माहिती विचारली. बोलता बोलता त्याने अचानकपणे विचारले, ''साहेब तुम्हाला काळ्या हळदीबद्दल काही माहिती आहे का हो?'' '' काळी हळद?'' मीच त्याला प्रतिप्रश्न केला. ''हां. लोक असं म्हणतात की काळी हळद असते.'' मी विचारलं ''त्यानं काय होतं? कशासाठी वापरतात?' त्यावर देवराम उत्तरला ''लोकांचा असा समज आहे की ही काळी हळद आपल्याजवळ खिशात ठेवली की आपले कुठलेही काम, कोर्टकचेरी, सरकारचे वगैरे लवकर होते. काळ्या हळदीमुळे समोरची व्यक्ती वश होते. तसेच त्यामुळे भूत पिशाच्च, करणी हे देखील मागं लागू शकत नाही. आमच्या इथल्या बऱ्याच लोकांनी शेतामध्ये, जंगलामध्ये खणून पाहिले. काही महिन्यापूर्वी तुमच्या सारखीच जीपमधून काही लोकं काळ्या हळदीचा शोध घेत घेत आली होती. पण अजून कोणालाच कधी काळी हळद सापडली नाही.'' देवरामच्या या माहितीमुळे मी अवाकच झालो. नंतर पुन्हा गप्पा सुरू असताना, ''साहेब तुम्ही इतक्यात कधी इंदिरा गांधींचं चित्रं असलेलं रूपयाचं नाणं पाहिलं आहे का?'' देवरामनं परत गुगली टाकला. ''नाही रे, का बरं?''. देवराम म्हणाला ''लोक असं म्हणतात की, इंदिरा गांधींचं नाणं सरकारला नेऊन दिलं तर एक लाख रूपये मिळतात.''

देवरामचे काही भाबडे काही गमतीशीर तर काही विचार करायला लावणारे प्रश्न, त्यानं दिलेली माहिती ऐकता ऐकता रात्रीचा एक कसा वाजून गेला ते कळलं नाही, थंडी पण वाढायला लागली होती म्हणून जाऊन झोपलो.

**मंगळवार** **२७ फेब्रुवारी १९९६**

सकाळी [illegible] पहाटे ५.३० वाजल्यापासून गप्पा सुरू झाल्या. चहा वगैरे झाल्यावर सगळ्या लोकांचा ग्रुप फोटो काढला आणि सगळ्यांचा निरोप घेऊन मोखाड्याला परत यायला निघालो. तेवढ्यात देवराम म्हणाला ''साहेब, जरा थांबा, मी आलोच.'' म्हणून धावत धावत घरी गेला. परत येताना त्याच्या हातात प्लॅस्टिकची पिशवी होती. ती पिशवी माझ्या हातात देत तो म्हणाला ''साहेब, ही आमच्यातर्फे छोटीशी भेट.'' त्या पिशवी मध्ये जवळजवळ दोन किलो तुरीचे दाणे होते. पिशवी घेताना जरा अवघडल्यासारखे झाले. मी त्याला म्हणालो, ''देवराम, याची काय आवश्यकता

होती?'' त्यावर तो म्हणाला ''नाही साहेब, आम्ही गरीब माणसं, दूर खेड्यापाड्यात रहाणारी. तुम्ही शहरातून इतक्या लांब आमच्यासाठी आलात, आमच्या बरोबर रात्रभर राहिलात, गप्पा मारल्या, माहिती सांगितली. पुन्हा कधी गाठीभेटी होतील ते काही सांगता यायचं नाही. म्हणूनच आमच्यापाशी जे काही थोडंसं होतं ते दिलं.''

एका रात्रीमध्ये एवढा स्नेह, जिव्हाळा, आपुलकी निर्माण होऊ शकते, आदिवासी माणसं किती जीव लावू शकतात याची प्रचीती आज येत होती. मोखाड्याला परतताना कळमपाडा, देवराम, तुरीचे दाणे हेच विषय मनामध्ये घोळत होते.

**बुधवार** **२८ फेब्रुवारी १९९६**

आज परत कळमपाड्याला जाण्याचा योग आला. जर्मन बँकेचे अधिकारी श्री. जेलेनिक तसेच बायफचे श्री. महाजन आले होते. या भागातील कुठली झाडे येऊ शकतील हे पहाण्यासाठी त्यांना इथले माती परिक्षण करायचे होते. मातीचे नमुने घ्यायला दुपारी गेलो.

परत आल्यावर झालेल्या कामाचा आढावा घेतला. श्री. नेलेनिक यांच्याशी चर्चा केली. १ मार्च १९९६ रोजी अभ्यास दौऱ्याचा पहिला टप्पा संपवून पुण्याला परतलो.

**मोखाडा तालुक्यातील सद्यस्थिती : काही निष्कर्ष**

गेल्या काही वर्षापर्यंत ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुका दुर्गम डोंगराळ भाग म्हणून गणला जात होता. आता रस्ते बांधले गेल्याने या भागाचा बाहेरच्या जगाशी संपर्क वाढला आहे. इथे बहुतांशी शेतजमीन डोंगर उताराबरच आहे. तालुक्याच्या दक्षिण भागापेक्षा उत्तर भागात जास्त डोंगर आढळतात तसेच जंगल क्षेत्रही बरेच आहे.

महादेव कोळी, कोकणा, वारली, ठाकर, कातकरी या आदिवासी जमाती प्रामुख्याने आढळतात. पैकी महादेव कोळी व कोकण लोक हिंदू कुणबी शेतकऱ्यांप्रमाणेच शेती करण्यात वाकबगार आहेत. कातकऱ्यांना अत्यंत मागासलेली जमात म्हणून सरकारने घोषित केले असून त्यांच्यासाठी विकासाच्या विविध योजना राबवल्या जात आहेत.

दिवसातून दोन वेळा नाचणीची भाकरी तर रात्री डाळ भात असा त्यांचा आहार असतो. काही लोकांना पिकलेले धान्य संक्रांतीपर्यंत तर काहींना होळीपर्यंत पुरते. अगदीच थोड्या लोकांना संपूर्ण वर्षभर धान्य पुरू शकते.

४०% नाचणी, ४०% भात, १०% वरई आणि १०% इतर कडधान्ये असे पिकांचे प्रमाण आहे. पावसाळ्यामध्येच शेतात पिकवलेल्या भाज्या खाल्ल्या जातात. इतर ऋतुंमध्ये आठवडे बाजारातून भाज्या व सुकट मासे आणले जातात जे केवळ ३-४ दिवसच पुरू शकतात. मटण किंवा कोंबडी केवळ सणासमारंभाच्या वेळेसच शिजवली जाते. वरईच्या विक्रीतूनच हातात रोख पैसे येतात मात्र हे पैसे दैनंदिन गरजा भागवण्यास पुरवठी पडू शकत नाही.

कातकरी लोक पावसाळा संपल्यानंतर सहकुटुंब स्थलांतर करतात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला आहे. स्थलांतराचे प्रमाण ५० ते ७०% आहे. जिल्ह्यातील मोठ्या शहरांमध्ये किंवा मुंबईला स्थलांतर केले जाते. कातकरी लोक वीट भट्ट्यांवर किंवा दगड, खडी फोडण्यासारख्या मेहनती कामांवर काम करताना आढळतात.

स्त्रियांच्या मुख्य समस्या म्हणजे निरक्षरता आणि पिण्याचे पाणी व इंधनाची कमतरता. पाणी व लाकूडफाटा गोळा करण्यातच स्त्रियांची शक्ती व वेळ खर्च होतो. या भागामध्ये गर्भपात व बालमृत्युंचे प्रमाण देखील खूप आहे.

कुटुंबामध्ये आर्थिक व्यवहारात तसेच इतर बाबींच्या निर्णय प्रकियेमध्ये स्त्रियांना अधिकार असतो. सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची धिटाई स्त्रियांमध्ये दिसून येते. महिला मंडळाच्या माध्यमातून एकत्र येऊन दारूच्या व्यसनाविरूद्ध स्त्रियांनी लढा उभारला आहे.

# पेठ आणि सुरगाणा

अभ्यास दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पेठ व सुरगाणा या नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यांची पहाणी केली गेली. ५ मार्चला पेठच्या विश्रामगृहात जाऊन स्थिरावलो. दुसऱ्या दिवसापासून काम सुरू झाले.

**बुधवार** **६ मार्च १९९६**

पेठ तालुक्यातील गावांमधल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी धावता दौरा केला. पेठ हे तालुक्याचे ठिकाण उत्तरेच्या टोकाला, नाशिकपासून ५५ कि.मी. वर वसलेले आहे. पेठहून निघून करंजाळी फाट्यावरून उजवीकडे वळून हरसूलला निघालो.

आजूबाजूचा प्रदेश हिरवागार दिसत होता. पाणी उपलब्ध असल्याने अनेक शेतकऱ्यांनी गहू, हरभरा तसेच टोमॅटो, वांगी यासारखी पिके घेतली होती. काही ठिकाणी मृदसंधारण खात्यातर्फे शेतजमीनींचे सपाटीकरणाचे काम चालू असल्याचे आढळले. वाटेतून जाताना बरेच लोक एस.टी.ची वाट बघत बसले होते. काही खासगी जीप गाड्या प्रवासी वाहतूक करताना आढळल्या. वाटले की आज बाजाराचा दिवस असल्याने गर्दी असेल पण हरसूलला पोहोचल्यावर कळले- बाजार शनिवारी असतो, लग्नसराई असल्याने खेडेगावातून लोक बस्त्यासाठी खरेदीसाठी येत होते. सारा बाजार माणसांनी फुलून गेला होता.

पेठ तालुक्याची भौगोलिक रचना मोखाड्यापेक्षा खूपच वेगळी आहे. मोखाड्यामध्ये जास्त उतार असलेले डोंगर बघायला मिळतात. सपाट मैदानी प्रदेश सापडणे तसे अवघडच याउलट पेठमध्ये कमी उतारांचे डोंगर विखुरलेले आढळतात. मधल्या भागामध्ये सपाट प्रदेशावर शेती चालते.

हरसूल सोडून जसजसे तालुक्याच्या पश्चिमेला जाऊ लागलो तसतसे हिरवीगार शेतं दृष्टीक्षेपात पडेनाशी झाली. रस्त्यावरची रहदारीसुद्धा विरळ होत गेली. जंगल दाट होऊ लागले. ठाणापाड्याच्या पुढे क्वचित एखादा गुराखी व मोळी वाहणाऱ्या बायका दिसल्या. चिंचपाडा वरून सर्वात शेवटी ओझरखेड या गावी जाऊन पोहोचलो.

ओझरखेड हे पेठ तालुक्यातील शेवटचे टोक. तालुक्याचे व जिल्ह्याचे ठिकाण जवळजवळ सारख्याच अंतरावर (अंदाजे ८० कि.मी.) इथून जवळच मोखाडा तालुक्याचा आसे बेरिस्ता भाग तसेच जव्हार तालुक्यातील वावर-वांगणी हा भाग आहे. दोन्ही ठिकाणी जायला कच्चा रस्ता आहे. लोकांचा वावर-बेहेडपाडा मार्गे जव्हारशीसुद्धा संबंध येतो.

ओझरखेडहून परत येताना देवडोंगरा या गावात थांबलो पण गावात लग्न असल्याने फारशी कोणी माणसे भेटली नाहीत. या दोन गावांना भेटी देऊन सखोल अभ्यास करण्याचे ठरले.

**गुरूवार** **७ मार्च १९९६**

देवडोंगराला जाताना वाटेत हातलोंढी या गावी थोडा वेळ थांबलो. गावामध्ये बऱ्याच लोकांनी रब्बी पिके घेतली होती. हरसूलच्या अलिकडे असलेल्या बागायती शेतीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी महादू भोये या कोकणा शेतकऱ्याची भेट घेतली.

हातलोंढी गावामध्ये ७० पैकी २० घरांची परिस्थिती चांगली आहे. १० कुटुंबांना पाण्याची सोय असल्याने मेथी, कोथिंबीर, टोमॅटो, वांगी गहू यासारखी पिके घेतली जातात. गावातली इतर कुटुंबे संक्रांतीनंतर नाशिकच्या परिसरात 'शेठ' लोकांच्या द्राक्षाच्या मळ्यावर कामाला जातात.

महादू भोये आणि इतर शेतकऱ्यांना सरकारने पाझर तलाव बांधल्यामुळे फायदा झाला. त्यामुळे १० जणांची शेती भिजली. सगळ्यांनी मिळून पाण्यासाठी इंजिन घेतलं त्यावर आता रब्बी हंगामात पिकं घेतली जातात. तयार झालेला माल नाशिकच्या मार्केट यार्डात नेऊन विकला जातो. टोमॅटोच्या एका १० किलोच्या क्रेटला ३०-४० रूपये भाव मिळतो. त्यामुळे आता ३-४ वर्षापासून आर्थिक परिस्थितीमध्ये फरक पडत चालला आहे.

शेतकऱ्यांना पिके, द्यावयाची खते, कीटकनाशके,

## आदिवासी कुटुंबाचा खर्च

| जमात<br>तपशील | कोकणा, महादेव कोळी<br>प्रतिवर्ष खर्च रू. | वारली, कातकरी<br>प्रतिवर्ष खर्च रू. |
|---|---|---|
| इतर अन्नधान्य | १५,००० | ४,००० |
| कपडे | २,५०० | १,२०० |
| औषधोपचार | ५०० | १०० |
| इंधन, वीज | ६०० | २५० |
| बस भाडे | ६०० | २५० |
| दारू | ९०० | ६०० |
| तंबाखू | ६०० | ३५० |
| होळी | १५०० | ५०० |
| दिवाळी | १,२०० | २०० |
| पाचवीची पूजा | १०० | १०० |
| विवाह | १५,००० | ८,००० |
| क्रियाकर्म | ३,००० | १,००० |

पाण्याच्या पाळ्या, निगराणी व इतर तांत्रिक माहिती नाशिक भागात मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांकडून मिळते. त्यामुळेच सूर्यफुलासारख्या गळित धान्याचे पीक इथला आदिवासी शेतकरी घेऊ लागला आहे.

दुपारी १ वाजता देवडोंगरा गावात पोहोचलो. गाव एका विस्तृत अशा कातळावर वसलेले. एकंदर तीनशेच्या आसपास असलेल्या घरामधून वारली व कोकणा जमाती सम प्रमाणात विभागल्या गेल्या आहेत. गावाला हेदपाडा, कामतपाडा, घोडबानी, लोहारपाडा व काथवडपाडा असे एकूण ५ पाडे आहेत.

टेकाडावर वसलेल्या या गावातून लांबवर शेतजमीन पसरलेली दिसत होती. शेतामध्ये गवत व भाताच्या पेंढ्याचे ढीग करून ठेवलेले दिसत होते. इथे गाईगुरांची संख्या लक्षणीय होती. मात्र जनावरे भाकड असल्याने वैरण उपलब्ध असून देखील 'आम्हाला दूध पहायला भेटत नाही' असे एका शेतकऱ्याने सांगितले.

देवडोंगरामध्ये पाण्याची समस्या अत्यंत गंभीर आहे. गावामध्ये ४ विहिरी आहेत त्यापैकी दोन खाजगी. होळीपर्यंत देखील पाणी पुरत नाही. दोन वर्षापूर्वी गावामध्ये पाणी योजना पूर्ण करण्यात आली. ४ कि.मी. वर असलेल्या काथवडपाड्याच्या विहिरीतून पाणी उचलून बंद नळाद्वारे देवडोंगरामध्ये आणलं होतं. मात्र योजना जेमतेम २-३ महिने चालली. पाण्याचा कमी दाब व वारंवार पाईप फुटण्याच्या प्रकारामुळे योजना बंद पडली. पाण्यामुळे स्त्रियांचे फार हाल होतात. इथल्या सार्वजनिक विहिरीजवळच वडाच्या झाडाखाली बांबूचा मांडव टाकण्यात आला आहे. गावातील

महिला रात्री हंडे घेऊन विहिरीवर झोपायला जातात, नंबर येईल तेव्हा पाणी भरावे लागते. विहिरीच्या तळाशी असलेल्या झऱ्यातून थोडे थोडे पाणी पाझरत रहाते. पंधरा मिनिटांनंतर तीन चार हंडे पाणी मिळते. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीसच ही परिस्थिती तर एप्रिल-मे मध्ये काय होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. पाण्यामुळे विहिरीवर होणाऱ्या भांडणातही वाढ झाली आहे.

सार्वजनिक विहिरीपासून शंभर फुटावरच एक खाजगी विहीर होती. विहिरीभोवती तारेचे कुंपण घातलेले. आणि कुंपणाच्या आत वांगी लावल्याचे आढळले. त्या विहिरीवर गावकऱ्यांना पाणी भरण्यास मनाई आहे.

सार्वजनिक विहिरीवरून भरल्या जाणाऱ्या पाण्याचा वापर केवळ पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी केला जातो. आंघोळ व कपडे धुण्यासाठी इथली लोकं तीन किलोमीटरवर असलेल्या दमणगंगा नदीवर जातात. नदी लांब असल्याने आठवड्यातून दोन-तीन वेळाच अंघोळ केली जाते.

गावातल्या लोकांकडे फारशी शेती नाही. त्यामुळे संक्रांत, होळी नंतर स्थलांतराला सुरूवात होते. इथली लोकं रस्ता, विहीर, इमारत वगैरेची कामं करण्यासाठी नाशिक पेठ, ईगतपुरी भागात जातात. गेल्यावर्षी गावातील ८५-९० लोक कोकण रेल्वेचे काम करण्यासाठी गोव्याला गेले होते.

गावामध्ये ७ वी पर्यंत शाळा, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे. गावापर्यंत वीज देखील पोहोचली आहे मात्र वीज देयक भरण्याची ऐपत नसल्याने घराघरातून आजही अंधारावर मात करण्यासाठी चिमण्यांचाच उपयोग केला जात आहे.

**शुक्रवार ८ मार्च १९९६**

बांबू, साग, खैराची झाडे असलेल्या जंगलातून वाट काढत कच्चा रस्ता ओझरखेडला येऊन पोचतो. नाशिक जिल्ह्याच्या कोपऱ्यात वसलेल्या या गावापासून जवळच ठाणे व गुजरातमधील बलसाड जिल्ह्याची हद्द आहे.

गावाच्या सुरूवातीलाच रयत शिक्षण संस्थेची मोठी आश्रम शाळा आहे. गावामध्ये शिरताना आठवडे बाजारासाठी बांबू आणि गोणपाटाच्या सहाय्याने गाळे बांधलेले दिसले. जमीनही शेणाने सारवलेली होती. गावाजवळ असलेले विळा हातोड्याचे स्मारक कम्युनिस्टांचा प्रभाव दर्शवत होते. तिथंच असलेल्या लक्ष्मण जानू भोये या शिंप्याच्या दुकानात बसून लोकांशी गप्पा मारायला सुरूवात केली. गावाचे थोरात पाडा, धायटी पाडा, ओझरखेड, कोशीम पाडा, रानीरपाडा, तुंगारपाडा, कडेगहाण असे ७ पाडे आहेत. सर्व पाडे धरून ५०० घरे असतील त्यापैकी २५% कोकणा तर ७५% वारली आहेत.

गावामध्ये लोक हातपंपाचे पाणी पितात. पाणी मुबलक असल्याने दुर्भिक्ष्य जाणवत नाही. गावामध्ये अजूनही वीज पोहोचलेली नाही. मात्र नाशिक जिल्ह्याच्या आकडेवारीनुसार सर्व गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे.

गावामध्ये नाशिकहून दोन एस.टी. बसेस येतात. एक दिवसा तर दुसरी मुक्कामी येते. कधीकधी प्रवासी कमी असतील तर ड्रायव्हर कंडक्टर वाटेतूनच गाडी परत फिरवतात किंवा मध्येच कुठेतरी थांबवून झोपतात. आदिवासी असंघटित असल्याने या प्रकाराविरूद्ध कोणीच तक्रार करत नाहीत.

गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहे मात्र तिथे केवळ शिपाई व नर्सबाई रहात असल्याचे लक्ष्मणने सांगितले. लक्ष्मण म्हणाला ''डॉक्टरला आम्ही फक्त ९ डिसेंबर १९९५ आणि २० जानेवारी १९९६ ला (पल्स पोलिओ अभियानाच्या वेळेस) पाहिले आहे, त्याच्यानंतर नाही. डॉक्टरनं कधी महिन्यातून एखादी चक्कर मारली तर मारली. त्यामुळे गावात एखादी सर्पदंशाची केस झाली तर अर्ध्या रस्त्यात मरतात.''

गावाजवळच १ किमी लांबीचं धरण होणार आहे. १०-१५ वर्षापूर्वी मोजणी पण झाली. एक दोन शेतकऱ्यांची जमीन धरणाखाली जात होती पण सगळ्यांचा फायदा होत आहे म्हटल्यावर ते जमीन सोडण्यास तयार झाले. त्यापुढे अजून काहीही हालचाल नाही.

गेले दोन-तीन वर्ष नागलीचं पीकदेखील नीट आलं नाही. नागलीला कष्ट जास्त करून देखील काही फायदा होत

नाही. रोग झालेली नागलीची ताटं गुरंसुद्धा (जनावरं) खात नाहीत अशी खंत लक्ष्मणने व्यक्त केली.

वारली लोकांकडे जमीन कमी आहे त्यामुळे ते कोकणा लोकांच्या शेतावर काम करतात, वन खात्याच्या कामामुळे दिवसाला केवळ ५० लोकांना रोजगार मिळू शकतो त्यामुळे लोक ४-४ दिवस काम वाटून घेतात. स्थलांतराचे प्रमाण ५०-६०% आहे. मार्चनंतर १ क्विंटल भात खावटी योजनेतून घेतला जातो.

आहाराविषयी बोलताना लक्ष्मण म्हणाला.'' इथली लोकं दोन वेळा जेवतात. डाळ, भात, नागलीची भाकरी हाच त्यांचा आहार असतो. वांगी, बटाटे, पापडी, वाल यासारख्या भाज्या कधीतरी खाल्ल्या जातात. मोवटी (मोहाची फळे ) व खुरसाणी (कारळे) पासून तेल काढले जाते. एका कुटुंबाला वर्षाला साधारपणे ५ लिटर तेल पुरते. सणावाराला, पाहुणे आल्यावर किंवा महिन्यातून एखादे वेळेस कधीतरी फोडणी द्यायची. एरवी तसंच खातो'' त्याच्या या बोलण्याने चाटच पडलो. आहारामध्ये ही लोकं तेलाचा किती कमी वापर करतात. याउलट शहरामध्ये एका कुटुंबाला महिन्याला ५ लिटर तेल देखील कमी पडते.

लोकांशी बोलताना बऱ्याच वेळेला ''नाईक कंपनी'' असा उल्लेख ऐकायला मिळाला, अधिक चौकशी करता असे समजले की ढोर कोळी जमातीच्या लोकांना आता ''नाईक कंपनी'' म्हटले जाते. तसेच त्यांना आता महादेव कोळी म्हणूनच गणले जाते. हा एक महत्त्वाचा बदल हळूहळू होत आहे.

नाईक कंपनीचे प्राबल्य असलेल्या कडेगहाण या गावामध्ये गेलो होतो. गावाला कच्च्या रस्ता सुद्धा नाही खडकांवरून चढूनच गावात पोहोचता येते. इथल्या घरातून दारिद्र्याचे दर्शन घडत होते. कामासाठी स्थलांतर केलेल्या लोकांच्या झोपड्या पार रिकाम्या होत्या. सर्व सामानसुमान व कुटुंबातील लोकांसहित ही लोकं पोटापाण्यासाठी दिवाळीनंतर बाहेर पडली होती. होळीच्या सणासाठी देखील परतली नाहीत. गावातली काही लोकं अजूनही कडूकंद खाऊन दिवस कंठतात. प्राथमिक शाळेत शिकवायला मास्तरच नाही म्हणून लोकांनी कुलूप लावले आहे. गावात वीज आलेली नाही. या पाड्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे सांगून गावच्या समस्या सोडवण्यासाठी काहीतरी करण्याची लोकांनी विनंती केली.

कडेगहाणची परिस्थिती मनात घोळवतच पेठला परतलो. विश्रामगृहावर पोहोचल्यावर मुटाटकर सरांनी आनंदाची बातमी सांगितली - ''आवारी गुरूजी पेठमध्येच आहेत आणि उद्यापासून आपल्या बरोबर ते दोन तीन दिवस इथल्या भागामध्ये फिरणार आहेत.''

**शनिवार ९ मार्च १९९६**

सकाळी दहा वाजता आवारी गुरूजींच्या जुनोठी या गावात जाऊन पोहोचलो. आमच्या बरोबर पेठचे पांडुरंग कोठारी होते.

जुनोठी, पेठपासून ४ कि.मी. अंतरावर असलेलं छोटंसं गाव. आम्ही पोहोचलो तेव्हा प्राथमिक शाळेमध्ये पालकसभा सुरू होती. सभेला १५ पुरूष तसेच ४ महिलादेखील हजर होत्या. तिथंच लोकांशी गावाकडच्या समस्या, विकास आदि विषयांवर चर्चेला सुरवात झाली.

''इथल्या आदिवासी भागामध्ये खरा प्रश्न पाण्याचा आहे. पावसाळ्यात डोक्यावर पाणी रहातं आणि लगेच तीन दिवसात जिरून जातं. पाणी व्यवस्थित अडवलं तर दोन जिल्हे सहज भिजतील. मोठ्या धरणामुळे जागा अडते. शेतकरी भूमिहीन होतात. त्याऐवजी नालाच पाच-सहा ठिकाणी अडवला पाहिजे. इथला पाझर तलाव गेली १३ वर्षे बंद आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी १० वर्षापूर्वी सर्वेक्षण झाले. त्यानंतर काहीच हालचाल नाही.

शेतीसाठी पाण्याची सोय झाली तर स्थलांतराचं प्रमाण खूप कमी होईल. सरकारच्या लक्षात येत नाही, तर आमच्या डोक्यात येऊन उपयोग काय?''

शेतीबद्दल बोलताना महादू म्हणाला, ''इथल्या लोकांची

आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. एक गड्डा दहा-बारा हजार रूपये खर्च करू शकत नाही. इथली जमीन आणि देशाकडच्या जमिनीत फरक आहे. इथल्या लोकांकडे भरमसाट जमीन दिसत असली तरी २५ एकर इथली जमीन देशावरच्या २ एकर जमिनीच्या बरोबर आहे. देशावर एकरी लाख रूपये उत्पन्न मिळू शकतं, नगदी पिकं घेऊ शकतात. या भागात शेतकरी मात्र केवळ पोटापुरतेच धान्य पिकते.

सरकारी योजना फक्त कागदोपत्रीच असतात. त्यांची माहिती देणं, पाहणी करणं नियमितपणे झालं पाहिजे. यशापयश पाहिले जात नाही. नुसतं भीकेसारखं दिलं जातं.

आवारी गुरूजींनी भावी काळातील योजना सांगितली ''पिठोंदी, आंब्याचा पाडा ही गावं डोंगरावर आहेत. गावातून दहा वर्षानंतर एकही मजूर कामाला बाहेर जाता कामा नये अशा प्रकारे नियोजन केले जात आहे. यापुढे आयुर्वेदाला महत्त्व येणार आहे. हिरडा, आवळा, बेहडा, रिठा यासारख्या औषधी वृक्ष वनस्पतींची लागवड गावाच्या आसपास करत आहोत. प्रत्येक कुटुंबाने २ झाडं जगवायची. १० वर्षात ६००-७०० वनस्पती तिथं दिसतील अशी अपेक्षा आहे. याशिवाय पपई, रामफळ, सीताफळ यासारखी झाडे पण लावणार आहोत. इमारती लाकूड देखील दहा वर्षानंतर तयार होईल.

बोरठ गावामध्ये एकही घर कारवीचं उरलेलं नाही. सर्व घरं विटांची झाली आहेत. जंगलातून घरासाठी चोरून लाकडं आणावी लागली. एकमेकांच्या विटा पाडल्या. सरपण आमच्या जवळ होतं. कष्ट झाले. सावकारी झाली फक्त खिळे, सिमेंट वगैरेसाठी.

घराकरता केलं (लाकूड तोडलं) तर काही नाही, तुरुंगात घातलं तरी जा, पण लाकूड मात्र विकायचं नाही. सरकारी योजनांचा लाभ घेतलाच पाहिजे. भूमिहीनांसाठी बकरीपालन योजना आहे. प्रामाणिकपणे लाभ घेतला तर गावातच हातोहात बकऱ्या विकल्या जातील. आदिवासी माणसाला देशी माणसाशी बरोबरी करता येणार नाही हे जरी खरे असले तरी त्याचा सगळा खर्च तर भागला पाहिजे. त्यासाठी केवळ सरकारवर विसंबून राहून चालणार नाही. स्वत:पण काहीतरी खटपट केली पाहिजे.

आदिवासी माणूस सुख, दु:ख व भूक ही दैवी देणगीच आहे असे पिढ्यान् पिढ्या मानत आलेला आहे. त्याच्या वाट्याला केवळ दु:ख आणि भूकच येते. जन्माला आलो म्हणून जगायचं हीच त्याची धारणा असते.''

जुनोठीमधली सभा संपल्यानंतर थोडावेळ गावातल्या कुटुंबांची माहिती घेतली आणि पुढे मार्गस्थ झालो. वाटेत शिवशेत आंबे येथे थांबलो.

तिथे लकवा उपचार केंद्र आहे. याठिकाणी पुण्यामुंबईपासूनचे लोक येतात. रूग्णांवर वनौषधी वापरून उपचार केले जातात. आवारी गुरूजी आणि पेठ तालुक्यातील इतर पारंपरिक वैद्यांनी आपला वारसा पुढे चालू रहावा, लोकांना कमी खर्चात उपचार करता यावेत म्हणून दमा, लकवा, मधुमेह यासारख्या निरनिराळ्या आजारांसाठी उपचार केंद्र उघडली आहेत. प्रत्येकजण एकेका आजारावर उपचार करतो. या सर्वजणांनी मिळून शिवशेत आंबे येथेच धन्वंतरीचे मंदिर देखील बांधले आहे.

सायंकाळी पाचच्या सुमारास बाऱ्हे, ठाणगाव मार्गे सुरगाणा तालुक्यातील राक्षसभुवन या गावी पोहोचलो. मधुरीपाडा आणि करंजुळ या पाड्यांची धरून एकूण १५० घरं. बहुसंख्य कोकणा. गावापासून गुजरात राज्याची सीमा अगदीच जवळ. गावातले लोक बुधवारी बाजाराला खडकी या पलिकडच्या गावाला जातात.

गावातले पाणी सरपण, शिक्षण स्थलांतर हे प्रश्न इतर भागासारखेच. इथली लोकं बलसाड, वापी, धरमपूर या ठिकाणी कामासाठी जातात. लाकूडतोड, मासेमारी आणि मीठागरात काम करणे हा त्यांचा व्यवसाय.

इथल्या इंधन प्रश्नाबाबत सुरेश महाले म्हणाला ''जंगल आता तुटत चालले आहे. जळणासाठी लाकूड आणायचे म्हणजे फॉरेस्ट खात्याचा त्रास होतो. तसेच एका कुटुंबाला वर्षभरासाठी २ ट्रक 'जंगली लाकूड' लागते. त्यापेक्षा सौर

कुकर, सुधारित चूल यासारखी उपकरणे वापरली तर जंगलतोड थांबेल तसेच लाकूड गोळा करण्यासाठी लागणारा वेळ व कष्टदेखील वाचतील.'' अपारंपरिक ऊर्जा साधनांविषयी आठवी शिकलेला आदिवासी युवक असे विचार मांडू शकतो हे खरंच भूषणावह आहे. सरकार तसेच स्वयंसेवी संस्थांनी अशा तरूणांना हाताशी धरून हे विचार खरंच वास्तवात आणले पाहिजेत.


आम्ही सुरगाणा पंचायत समितीचे उपसभापती श्री. हरिभाऊ महाले यांच्याकडे उतरलो होतो. त्यांच्या घरामध्ये दूरदर्शनवर भारत-पाकिस्तान दरम्यान चालू असलेला विश्वकरंडक क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी जवळजवळ ७०-७५ लोक दाटीवाटीने बसले होते. लहान पोरापासून ते म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण अत्यंत उत्कंठतेने सामना पहात होते. आदिवासी भागातही क्रिकेटचे वेड किती खोलवर पसरले आहे याचे दर्शन घडत होत.

राक्षसभुवन हे गाव कम्युनिस्टांचे. हरिभाऊंच्या घरी मार्क्स लेनिनचा फोटो लागलेले. तीस पस्तीस वर्षापूर्वी गोदावरी परूळेकर यांच्या प्रयत्नामुळे गावामध्ये दारूबंदी झाली. विशेष म्हणजे अजूनही कोणी गावात दारू पीत नाही. गावामध्ये आजही एकजूट कायम आहे आणि त्याचेच प्रत्यंतर दुसऱ्या दिवशीच्या सभेत आले.

**रविवार** **१० मार्च १९९६**

सकाळी साडेसात वाजता हरिभाऊंनी गावाची सभा बोलावली होती. त्याला ४० जण हजर राहिले. इथल्या पावसाविषयी एका माणसाने फारच बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली. ''या भागात इतका पाऊस पडतो, पावसाळ्यात गावची नदी दुथडी भरून वहात असते असं वाटतं की आमच्या इथल्याच पाण्यानं अर्धा समुद्र भरत असेल. पण आम्हाला त्याचा काहीच उपयोग नाही फक्त पावसाळ्यात पिकं घेतो. दिवाळीच्या वेळेस बांध टाकला तर त्याचा शेतीसाठी उपयोग होऊ शकेल.''

हरिभाऊ बायफच्या वांझदा (गुजरात) येथील लाछकडी प्रकल्प पहायला गेले होते. तिथल्या सारखीच आंब्याची झाडे या भागात देखील लावता येतील असे त्यांनी सांगितले.



मात्र पाण्याचाच प्रश्न आहे. "जवळ पाणी असलं तर बाईमाणूस १०० झाडं देखील शिपू शकेल. इथे पिण्याच्या पाण्यालाच वेळ लागतो. तर झाडाला कुठून देणार?" असाही एक प्रश्न.

सरकारी योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, जाचक अटी, नियम यामुळे सामान्य माणूस पार जेरीला येतो. त्यांच्याच भाषेत सांगायचं झालं तर "कायदा इतका गाढव की डबडं घेऊन जंगलात गेलं तरी केस होऊ शकते." या वाक्याचा मतितार्थ असा की अगदी क्षुल्लक कारणांसाठी आदिवासी लोकांची अडवणूक केली जाते. कायद्याचा बडगा दाखवला जातो. गरीब, अशिक्षित अडाणी म्हणून ठिकठिकाणी अडवले जाते.

भ्रष्टाचाराबाबत बोलताना हरिभाऊ म्हणाले "तालुक्यात घनदाट जंगल आहे ते कापून तिथं निलगिरी, सुबाभूळ यासारख्या निकृष्ट झाडांचं वनीकरण करायची योजना होती. होतं. आम्ही त्याला विरोध केला. वनीकरण करायचं, नफा पाहिजे तर उघड्या डोंगरावर झाडे लावा. जितकं लावायचं असेल तितकं लावा पण आहेत ती झाडं अजिबात तोडू देणार नाही." शेवटी वनखात्याला जंगलतोड थांबवावी लागली.

सभेनंतर हरिभाऊ आम्हाला गावच्या प्राथमिक शाळेत घेऊन गेले. तिथं त्यांनी शाळेच्या मुलांसाठी खरेदी केलेल्या बसकरपट्ट्या दाखवल्या. या बसकरपट्ट्या खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्षांनी ५४ (२) हा नियम वापरून घाईघाईने स्वत:च्या अधिकारात जिल्हयातल्या साडेतीनशे शाळांसाठी बसकरपट्ट्या खरेदी करण्यासाठी टेंडर काढले. त्या बसकरपट्ट्या म्हणजे लक्तरं झालेले कापडाचे जाड तुकडेच होते. त्यापेक्षा पायपुसणं बरं म्हणायचं. हरिभाऊ म्हणाले "ज्या गोष्टीमध्ये वैयक्तिक फायदा असेल ती गोष्ट लगेच केली जाते. तर जिथं लोकांचा फायदा असतो आणि स्वार्थ साधता येत नाही अशा गोष्टींना मुद्दामून वेळ लावला जातो." तीच गोष्ट शैक्षणिक साहित्याबद्दल. हे साहित्य म्हणजे निकृष्ट दर्जाचे सुटे भागच होते. त्या साहित्याला 'शैक्षणिक साहित्य' का म्हणायचे हाही एक प्रश्नच आहे. या साहित्याचा काहीच उपयोग होऊ शकत नाही. शाळेच्या शिक्षकांनी मात्र अगदी हे सर्व जपून ठेवलेलं. निरीक्षक आल्यावर त्यांना पै न् पैचा भागाभागाचा आणि लक्तर-लक्तराचा हिशोब दिला पाहिजे ना! नाहीतर शिक्षकांवरच गैरप्रकार केल्याचा आरोप व्हायचा.

भ्रष्टाचाराबद्दल आवारी गुरूजींनी मोठी मार्मिक टिप्पणी केली. "पूर्वीच्या काळी राक्षस जरी दुष्ट असले तरी ठराविकच अन्न खायचे. बकासूर गाडाभर भात आणि दोन माणसं खायचा. आता लोक काहीही खायला लागले आहेत. पैसा, सिमेंट, वाळू, पूल..."

राक्षसभुवनाहून आम्ही सुरगाणा तालुक्याच्या उत्तरेला असलेल्या गुही या गावात गेलो. वनवासी कल्याण आश्रम संस्थेच्या शाळेत जाऊन स्थिरावलो.

दुपारी व रात्री आवारी गुरूजींशी खूप गप्पा झाल्या. कोकणा जमातीच्या असलेल्या आवारी गुरूजींना चालता बोलता ज्ञानकोशाच म्हटले पाहिजे. ते स्वत: वनौषधींमध्ये पारंगत तर आहेतच तसेच अभ्यासक विचारवंत देखील आहेत. सबंध पेठ तालुका त्यांना पायाखालून घातला आहे. त्यांना तालुक्यातील वनस्पतींची खडान् खडा माहिती आहे. त्यांची कार्यपद्धती अत्यंत शिस्तबद्ध आहे. त्यांच्याजवळ खिशामध्ये एक डायरी नेहमी असते. त्यांच्यामध्ये सर्व झाडे वनस्पतींची आद्याक्षरानुसार नावे लिहून ठेवली आहेत. जवळपास ६५० वनस्पतींची यादी भरेल. कुठली वनस्पती कुठे मिळेल, कशाचा कुठला भाग उपयोगात आणला जातो अशा प्रश्नांची गुरूजी लगेच उत्तरे देतात. गुरूजींना काळ्या हळदीबद्दल विचारले, त्यांनी सांगितले, "काळी हळद खरंच असते. लागेल तेवढी आणून देऊ शकतो. त्याला औषधी उपयोग आहेत. पण त्यामुळे काम होतात, भूतबाधा होत नाही, माणूस वश होतो हे सगळं खोटं आहे."

गुरूजींना भेट म्हणून 'हाकाराचा' अंक दिला. त्यांनी तिथेच जमिनीवर बसून वाचायला सुरुवात केली. टिपणं काढण्यासाठी पिशवीतली वही काढायला ते विसरले नाहीत.

गुरूजींची अभ्यासू वृत्ती सत्याहत्तराव्या वर्षीही कायम आहे.

गुरूजींनी काही गमतीशीर गोष्टी सांगितल्या.

"सुबाभूळ म्हणजे मंत्र्याचं झाड. एक महिन्यानंतर जनावर देखील त्याला तोंड लावत नाही."

"सरकारमध्ये अमर असलेली खाती दोनच - शिक्षण खाते आणि एम.एस.ई.बी."

"या जगामध्ये तीन गोष्टी पाण्याशिवाय राहू शकत नाहीत. ब्राम्हण, टिटवी आणि धोबड किंवा रेडा"

"माणसानं नेहमी राग आणि रोग यापासून दूर राहिलं पाहिजे."

गुरूजींच्या गप्पा ऐकणे म्हणजे एक वेगळाच अनुभव असतो. त्यामध्ये अभ्यासपूर्ण माहिती, उपहासात्मक टीका, शाब्दिक कोट्या, मनाला भिडणाऱ्या, भावणाऱ्या गोष्टींचे बेमालूम मिश्रण असते. अनुभवसमृद्ध खजिन्यातल्या गोष्टी ऐकण्यात वेळ कसा जातो कळतच नाही. त्यासाठी काही आठवडेदेखील पुरायचे नाहीत.

**सोमवार ११ मार्च १९९६**

सकाळी कुकुडणे गावाला गेलो होतो तर नॅन्सीताई सोनगीरला गेल्या होत्या.

सगळीकडच्या समस्या पाणी, इंधन, स्थलांतर या विषयांभोवतीच घोटाळत होत्या. परत परत तीच तीच माहिती मिळू लागली फक्त नाव, गाव, चेहरे वेगळे. या भागातील परिस्थितीचा अभ्यास करण्याचे काम पूर्ण झाले होते म्हणून दुपारी नाशिकला परतलो.

**नाशिक जिल्ह्यातील सद्यस्थिती : काही निष्कर्ष**

पेठ आणि सुरगाणा तालुका ठाणे जिल्ह्यातील जव्हार तसेच गुजरातमधील धरमपूर या बायफचे काम चालू असलेल्या तालुक्यांना लागूनच आहे.

पेठ तालुक्यातील हरसूल पर्यंत गहू, वांगी, टोमॅटो, कांदा, मिरची यासारखी रब्बी बागायती पिके आढळून आली. हरसूलपुढे पाण्याच्या सोयीअभावी रब्बी पिके घेतली जात नाहीत.

कोकणा, वारली, महादेव कोळी आणि ढोर कोळी या इथल्या मुख्य जमाती आता सर्व ढोर कोळी स्वत:चा उल्लेख 'महादेव कोळी' असाच करतात. या लोकांची संस्कृती ठाणे जिल्ह्यातील आदिवासींसारखीच आहे. ठाणे जिल्ह्यातील कातकऱ्यांसारखेच इथले ढोर कोळी मागासलेले आहेत. त्यांच्याकडे कसायला जमीन नाही, मजुरी करूनच चरितार्थ चालवला जातो.

भात (६०%) व नाचणी (३०%) हीच मुख्य पिके. दोन जेवणांमध्ये नाचणीची भाकरी तर तिसऱ्या जेवणात भाताचा समावेश असतो. उन्हाळ्यामध्ये एका जेवणाऐवजी, सकाळी नाचणीची पेज पिली जाते.

जंगल तुटत चालल्याने इंधनाची समस्या भेडसावत आहे. नळपाणीपुरवठा योजना, हातपंप गावागावातून आढळून येतात, मात्र चालू स्थितीत नसल्याने उन्हाळ्यामध्ये लोकांचे पाण्यासाठी फार हाल होतात.

जिल्ह्यामध्ये स्वयंसेवी संस्थांच्या आश्रम शाळांमुळे मुलांच्या शिक्षणासाठी चांगली सोय झाली आहे. मुलींच्या गळतीचे प्रमाण बरेच आहे. फारच थोड्या मुली दहावीपर्यंत जातात. जमीन असलेल्या कोकणा व महादेव कोळी यांच्यापेक्षा वारली व ढोर कोळी जमातीत शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे.

सरकारी आरोग्य सेवा एक तर अत्यंत अपुरी आहे. तसेच अनेक ठिकाणी बंद अवस्थेत आढळून आली. सरकारी सिंचन योजनेचा ज्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला त्यांनी दुसरे पीक घेण्यास सुरुवात केली आहे. दारिद्रय रेषेखालच्या लोकांसाठी असलेली गृहबांधणी योजना सोडली तर इतर योजनांचा लाभ लोकांना मिळू शकलेला नाही.

## अभ्यास दौऱ्यातील निष्कर्ष

महाराष्ट्रातील मोखाडा (जि. ठाणे) पेठ व सुरगाणा (जि. नाशिक) या तालुक्यातील गावांचा तीन आठवडे केलेल्या दौऱ्यानंतर पुढील ठळक गोष्टी समोर आल्या.

या तीनही तालुक्यातील मुख्य समस्या म्हणजे स्थलांतर. दिवाळीनंतर स्थलांतराला सुरवात होते. उन्हाळ्यात ७०% लोक अर्थार्जनासाठी शहरी भागाकडे स्थलांतर करतात.

मोखाड्यातील महादेव कोळी, पेठ, सुरगाणा मधील कोकणा जमात हे हिंदु कुणब्यांप्रमाणे अत्यंत प्रगतशील शेतकरी आहेत. वारली जमात तेवढी प्रगत नाही. कातकरी तर अत्यंत मागासलेले असून जमीन नसल्यामुळे पोटापाण्यासाठी भटकंती करताना आढळतात. जंगलांचा ऱ्हास झाल्याने आदिवासी रोख उत्पन्न मिळवण्यासाठी जंगलोत्पादनावर अवलंबून राहू शकत नाही. काही कातकरी लोक जंगलातून वस्तू गोळा करण्यासाठी दूरवर भटकंती करतात.

सरकारी व खाजगी आश्रम शाळांमुळे आदिवासींच्या मुलांना शिक्षणाची चांगली सोय उपलब्ध झाली आहे. या शाळांचा लाभ कातकरी वगळता सर्व जमातींना होत आहे. देशातील इतर भागांप्रमाणेच सरकारी आरोग्य सेवांचा फार कमी लोक लाभ घेतात. खाजगी आरोग्य सेवा, तालुक्याच्या तसेच इतर मोठ्या गावातून आढळतात. सरकारी घर योजनांचा लाभ, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना मिळाला आहे. सरकारी योजनेतून बांधलेल्या बंधाऱ्यांची अवस्था मात्र दयनीय आहे. शेतीसाठी पाणी योजनेचा लाभ मूठभर मोठ्या शेतकऱ्यांनाच मिळाला आहे.

मोखाडा तालुक्याध्ये १० ते १५ एकर वा त्यापेक्षाही जास्त जमीन असणारे शेतकरी असले तरी त्यापैकी ५ ते ७ एकर जमीनच लागवडीसाठी योग्य असते. जल सिंचनाची सोय झाली तर ही पडीक जमीनसुद्धा लागवडीखाली आणता येईल. पावसाच्या पाण्यावर पिकलेले अन्नधान्य कुटुबांना केवळ ३ ते ६ महिनेच पुरु शकते. त्यानंतर मुंबई व उपनगरे, नाशिक आणि शेजारच्या गुजरात राज्यामध्ये स्थलांतर केले जाते.

आदिवासी लोक आता राजकीयदृष्ट्या जागृत झाले आहेत. त्यामुळे केवळ राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवर नव्हे तर तालुका व ग्राम पातळीवरच्या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतात. राजकीय पक्षदेखील गावागावातून पोहोचले आहेत.

आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत असला तरी त्यामुळे तरुणांच्या बेरोजगाराची समस्या उद्‌भवली आहे. दहावी पर्यंत शिक्षण झालेल्या तरुणांना राखीव जागा असून देखील नोकरी मिळत नाही आणि हे तरुण शेतामध्ये काम करण्यास तयार होत नाहीत.

सर्व गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले असल्याने खेडोपाडी दूरदर्शन संच पोहोचले आहेत. हिंदी आणि मराठी चित्रपट व गीतांबरोबरच तरुण युवक क्रिकेटचे आंतरराष्ट्रीय सामने पहाताना आढळले. आदिवासी भागातही डिश ॲंटेना व इतर वाहिन्या पोहोचल्या आहेत.

आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शहराकडे होणारे स्थलांतर थांबवले नाही तर त्यांचा अमोल असा सांस्कृतिक वारसा नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. आणि अशा स्थलांतरित आदिवासींच्या लेखी अकुशल, असंघटित मजूर म्हणून शहरातील झोपडपट्ट्यातून नामुष्कीचे जिणे जगण्याची वेळ आली आहे.

महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण कोकणा व महादेव कोळी जमातीमध्ये वाढत असले तरी वारली व कातकरी जमातीत कमीच आहे. जळणासाठी जंगलातून लाकूड आणण्यात आणि उन्हाळ्यात पाणी भरण्यातच स्त्रियांचा बराचसा वेळ व श्रम खर्ची पडतात. पुरुष मंडळी शहराकडे स्थलांतर करत असल्याने शेतजमीन तयार करण्याचे कामही स्त्रियांनाच करावे लागते. पुरुषांचे दारुचे व्यसन ही स्त्रियांची एक मोठी डोकेदुखी. काही गावातून स्त्रिया संघटित होऊन दारुविरूद्ध लढा देत आहेत. बचत गट सुरु झाल्याने आदिवासी स्त्रियांना अधिक आर्थिक स्वातंत्र्य मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

● ● ●

# ओरिसा : सामाजिक व आर्थिक परिस्थिती

## अभ्यास दौरा अहवाल

- प्रा. रा. के. मुटाटकर, नॅन्सी गायकवाड

ओरिसा, भारताच्या मध्य पूर्वेला वसलेले राज्य. जगप्रसिद्ध चिल्का सरोवर, भुवनेश्वर, जगन्नाथपुरी, कोणार्क या शहरांमध्ये प्राचीन वास्तुशिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या मंदिरासाठी तसेच कटक येथील चांदीचे कलाकुसरीचे दागदागिने व वस्तुंसाठी प्रसिद्ध असलेला प्रदेश. या राज्यामध्ये जंगलात रहाणाऱ्या आदिवासींचे प्रमाणही बरेच आहे. फारसे विकसित न झालेले हे राज्य कधीकधी इथल्या कोरापुट, कालाहांडी जिल्ह्यात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्युंमुळे प्रकाश झोतात येते.

अशा या ओरिसा राज्यात मार्च-एप्रिल १९९६ दरम्यान एक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. पुणे विद्यापीठातील मानवशास्त्राचे प्राध्यापक रा. के. मुटाटकर तसेच टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील प्रा. नॅन्सी गायकवाड यांनी या अभ्यास दौऱ्यात भाग घेतला.

या पाहणी दौऱ्याचा मुख्य उद्देश ओरिसा राज्यातील आदिवासी लोकांचे सद्यस्थितीतील रहाणीमान, आर्थिक परिस्थिती, शेतीवाडी, जंगलावरची अवलंबिता वगैरे बाबींवर शास्त्रीय पद्धतीने माहिती गोळा करणे हा होता. फुलबनी जिल्ह्यातील दारिंगवाडी व तुमडीबंध, कोरापुट जिल्ह्यातील बिसमकटक व मुनीगुडा तसेच कालाहांडी जिल्ह्यातील मदन रामपूर या विभागातील खेड्यांमध्ये जाऊन लोकांशी बोलून माहिती मिळवली गेली. पाखालमा, मारडीपोंगा, रंगपल्ली, रंगोपारू, दुमामास्का, दुवी, कुर्ली, खांबेसी, मुंडा, उर्लीधामणी, कालीआमुंडा, गड्डाडी, रिंगझा, पोटिंगा, सारगुळ ही खेडी त्यापैकीच.

या अभ्यासातून मिळालेली माहिती प्रस्तुत लेखातून मांडली आहे.

ओरिसात बरेच आदिवासी अजूनही जंगल कटाई करून त्या जागेवर कापून स्थलांतरित शेती करतात. त्यास 'पोडू' म्हणतात. पोडू थांबवून आदिवासींचे पुर्नवसन कसे करावयाचे याकरिता योजना आखण्यासाठी हा अभ्यास दौरा आयोजिला होता.

### दारिंगवाडी विभाग :

दारिंगवाडी हे या भागातील एक मुख्य ठिकाण, ओरिसा राज्याची राजधानी भुवनेश्वरपासून ३०० कि.मी. अंतरावर वसले आहे. जंगलातील वृक्षांच्या दाटीवाटीतून मार्ग काढीत घाटाचा वळणावळणांचा रस्ता दारिंगवाडीमध्ये आणून सोडतो. या भागामध्ये सपाट प्रदेश फारसा आढळत नाही. डोंगर उतारावर पडलेली झाडे आणि जाळले जाणारे गवत 'पोडू' ची तयारी चालू असल्याचे दर्शवतात.

रस्त्याच्या कडेने जाताना आंबा, फणस, साल, बांबू तसेच काजू, मोह, सालप आणि इतर अनेक वृक्षांची दाटी झालेली दिसते. गावाच्या हद्दीमध्ये शिरताच तसेच परसबागेमध्ये सुद्धा फणस, पपई, आंबा, पेरू, बोर ही झाडे आढळतात. निवडुंग आणि एरंडाचे घराभोवती कुंपण घातले जाते. जिकडे तिंकडे हळदीवर प्रक्रिया चालू असल्याचे बघायला मिळाले. याचबरोबर घरे बांधण्यासाठी विटा पाडणे हा उद्योग गावागावातून सुरू असलेला दिसला. या भागामध्ये वाहतुकीची साधने फारच थोडी आहेत. प्रवाशांनी तुडुंब भरलेल्या खासगी बसगाड्या पहायला मिळाल्या. बाकी वाहतूक फारशी अशी नव्हतीच.

इथे देसिया कोंड ही मुख्य आदिवासी जमात आढळून येते. देसिया कोंड स्त्री सहजपणे ओळखता येऊ शकते.

तिच्या चेहऱ्यावर निरनिराळ्या प्रकारची नक्षी गोंदवलेली असते. साडी आणि चोळी हा स्त्रियांचा पेहराव. वृद्ध स्त्रिया चोळी घालत नाहीत. पुरूष रंगीत लुंगी नेसतात. कधीकधी अंगामध्ये शर्ट घालतात.

इथे असणाऱ्या अनुसूचित जातीच्या स्त्रियांपेक्षा कोंड स्त्री अधिक उजळ व दिसण्यात सुंदर असते.

देसिया कोंड स्त्री कानामध्ये १५ रिंगा तर नाकामध्ये ३ रिंगा घालते. काना-नाकात घातल्या जाणाऱ्या रिंगा हे कोंड स्त्रीचे आणखी एक वैशिष्ट्य.

इथली घरे तशी छोटीच असतात. घराच्या भिंती विटांनी बांधून लाल मातीने सारवल्या जातात. भिंतीवर नक्षीकामसुद्धा केले जाते. छप्पर बहुधा गवताचेच किंवा पत्र्याचे असते. घरामध्ये शिरण्यासाठी छोटा दरवाजा असतो, त्यामुळे वाकून मगच आत शिरावे लागते. बैठकीच्या खोलीमध्ये धान्य साठवण्यासाठी सोय केलेली असते. डाव्या बाजूलाच स्वयंपाक घर असते. स्वयंपाकघरात कांडण्यासाठी उखळ असते. त्यालगतच एक चौथरा असतो. ज्यावर तयार केलेले द्रोण व पत्रावळी ठेवल्या जातात. घराच्या पाठीमागे एक कोठीची खोली असते. सर्वसाधारणपणे प्रत्येक घराची रचना याच प्रकारची असते. गुरांचा गोठासुद्धा घराचाच एक भाग असतो. जनावरांचे मूत्र वाहून जावे म्हणून तिरपा लाकडी मंच तयार केलेला असतो. शेळ्या बांधण्यासाठी वेगळी सोय केलेली असते. शेळ्यांच्या लेंड्या गोळा करण्यासाठी गोठ्याचा तळ जमिनीपासून दोन फूट वर उचलून घेतात.


आदिवासींच्या घरातील तसेच गोठ्यातील स्वच्छता वाखाणण्यासारखी असते. प्रत्येक घरापाठीमागे परसबाग केलेली असते. पपई, फणस, केळी, शेंगा वगैरेसारखी उपयुक्त झाडे लावलेली असतात. काही गरीब कोंड कुटुंबांना सरकारतर्फे इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरे बांधून दिली आहेत. ही नवीन घरे पारंपरिक घरांपेक्षा वेगळी दिसतात.

एका गावामध्ये साधारणपणे ३० ते ४० कुटुंब वस्ती असते. एका घरामध्ये सरासरी सहा लोकं रहातात. हरिजन लोक रोमन कॅथॉलिक पंथाचे आहेत तर देसिया कोंड बॅप्टिस्ट. दोन्ही पंथांची वेगवेगळी चर्चेस आहेत. अनुसूचित जातीच्या लोकांनी ईस्टर संडे साजरा केला तर बॅप्टिस्ट कोंड लोक त्यापासून दूर राहिले. कोंड लोक जमिनीला धरणी माता मानतात. 'पोडू' साठी झाडे तोडायची असल्यास अगर धान्य पेरायचे असल्यास त्याआधी धरणीमातेला म्हशीचा बळी द्यावा लागतो असा त्यांचा समज आहे.

या भागात आदिवासी आणि अनुसूचित जातीचे लोक एकत्र रहात असले तरी आदिवासी लोक स्वत:ला हरिजनांपेक्षा उच्च दर्जाचे मानतात. आदिवासी स्वत:ला जंगल आणि डोंगरदऱ्यांचे राजे किंवा मालक समजतात. दारिंगवाडी विभागात हरिजन लोक सुद्धा 'पोडू' पद्धतीच्या शेतीमध्ये भाग घेतात. जर त्यांना 'पोडू' मध्ये जमीन कसायला मिळाली नाही तर ते अर्थार्जनासाठी बाहेरगावी स्थलांतर करतात. हरिजन लोकांना विणकाम, टोपल्या तयार करणे, वेगवेगळ्या प्रकारचे झाडू तयार करणे वगैरे कौशल्य अवगत आहेत. ते सुतार काम सुद्धा करू शकतात. आदिवासी लोकांच्या वतीने हरिजन व्यापारसुद्धा करतात त्यांचा गुरे खरेदी करून विकणे हाही एक व्यवसाय आहे. हरिजन स्त्रिया द्रोण आणि पत्रावळी तयार करतात.

जमीन, जंगल, डोंगर आणि झाडे यांसारख्या साधनसंपत्तीवर कोंड लोक आपली परंपरागत मालकी असल्याचे सांगतात. कायदेशीररीत्या कोणाचीही मालकी असो, कोंड लोक स्वत:ला सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीचे पालक व विश्वस्त समजतात. हरिजन लोक या साधन संपत्तीचा वापर कोंड लोकांच्या पूर्वपरवानगीने करू शकतात.

केवळ १० ते २० टक्के लोकांची जमीन कायदेशीररित्या स्वत:च्या मालकीची आहे. बहुधा अशा लोकांकडे ३ ते ४



**ओरिसातील आदिवासींचे पारंपारिक नृत्य**

एकरच जमीन असते. कायदेशीर मालकी असलेली जमीन जास्तीत जास्त ७-८ एकराच्या पलीकडे जाऊ शकत नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून बहुतांशी सर्व आदिवासी लोक 'पोडू' प्रकारच्या स्थलांतरित शेतीमध्ये सहभागी होतात. या पद्धतीत गावातील सर्व आदिवासी कुटुंबांना जंगलाची जमीन योग्य रीतीने विभागून दिली जाते.

फार पूर्वीच्या काळात आदिवासी भागात स्थलांतर केलेल्या अनुसूचित जातीची लोक छोट्या उद्योगधंद्यामध्ये गुंतलेली आहेत. काही हरिजन कांदे, बटाटे, मीठ यासारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंची छोट्या दुकानातून विक्री करतात. काही लोक बैल, रेडे शेतीच्या कामांसाठी भाड्याने देतात. विटा तयार करणे, रस्त्याची कामे, बांबूची तोडणी वराहपालन यासारख्या कामात देखील अनुसूचित जातीचे लोक वाकबगार आहेत. त्यांना रोजंदारीवर काम केल्यास १५ ते ३० रूपयांपर्यंत मजुरी मिळते.

हळद आणि आले ही दोन नगदी पिके या भागात घेतली जातात. भात, मका आणि कुळीथ ही इतर पिके होत. तसेच मोहरी आणि नाचणीची सुद्धा थोड्या प्रमाणात लागवड केली जाते. 'पोडू' च्या शेतीमध्ये नाचणी, कुळीथ व इतर अनेक कडधान्ये तसेच तृणधान्ये घेतली जातात. त्यापैकी

काही पुढीलप्रमाणे - तृणधान्ये : कोहिरी, कुर्सा, बिरी, आरारूट, कोंगु, सुआरी, कडधान्ये : जुडोंगा, कोंदुलु, कोटिंगा, धुलिआ, कोत्रा, चोक्रु, भाज्या : वैतलु, पोटुलु, लहु, कांकुडी, गोयलो, सरीकोंढ, शंकांध, कोंढानायल, भात आणि हळद 'पोडू' मध्ये पिकवली जात नाही.

एखाद्या कुटुंबाकडे जर ३ एकर शेती असेल तर पिकणाऱ्या भातावर ६ जणांचे कुटुंब जास्तीत जास्त केवळ ६ महिने गुजराण करू शकते. नाचणी आणि इतर तृणधान्ये आणखी ३ महिनेच पुरू शकतात. जंगलातून गोळा करून आणलेली फळे, कंदमुळे, भाजीपाला, मोहाची फुले वगैरे गोष्टी अडचणीच्या वेळेस पोट भरायला उपयुक्त ठरतात. वराहपालन, जंगल उत्पादनांची विक्री तसेच मजुरी करून मिळालेल्या पैशावर कशीबशी वर्षभर गुजराण होण्यास मदत होते.

भूमीहीन कुटुंब जर का कोंड असेल तर त्यांना 'पोडू' मध्ये जमीन कसायला मिळते. भूमीहीन कुटुंबाचा मुख्य आर्थिक स्रोत मजुरी तसेच वराहपालन, कुक्कुटपालन अथवा किरकोळ व्यापार हाच असतो. जंगल उत्पादनांची विक्री तसेच फळे कंदमुळांचा उपयोग अडचणीच्या वेळी भूक भागवण्यासाठी होतो.

आदिवासी लोक सामान्यत: दिवसातून तीन वेळा जेवतात. हिवाळ्यामध्ये कुटुंबाला व्यवस्थित पोटभर खायला मिळते. मात्र उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्यांचा आहार तीन जेवणांवरून दोन जेवणांवर येतो. सकाळी न्याहारी आणि दुपारी जेवणाच्या वेळेस भाताची किंवा नाचणीची पेज आणि भाजी असा आहार असतो. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये आंब्याच्या कोयी आणि सालप वृक्षाची साल यावरच दिवस भागवला जातो. रात्रीच्या वेळेस डाळ, भात आणि असल्यास कसलीतरी भजी केली जाते. वाळवून ठेवलेले मासे जेवणामध्ये कालवण म्हणून वापरतात. तसेच समाजाने केलेल्या धार्मिक विधींमध्ये मिळालेल्या मांसाच्या प्रसादाचे बारीक तुकडे करून वाळवून ठेवले जातात व त्याचा जेवणामध्ये कधीकधी वापर केला जातो.

या भागामध्ये शेतीपासून रोख उत्पन्न काही मिळू शकत नाही. परंपरागत पद्धतीने चालणारी शेती, कमी कस असलेली जमीन, 'पोडू' पद्धतीची स्थलांतरित शेती यामुळे प्रति एकरी उत्पादन फारच कमी येते. भाताचे उत्पादन प्रति एकरी १२५ ते २०० किलोपर्यंत तर इतर तृणधान्यांचे ७५ ते २०० किलोपर्यंत होते. कडधान्यांचे ५० ते १५० किलो तर हळदीचे उत्पादन ७५ ते १०० किलोपर्यंत प्रति एकर असल्याचे आढळून आले. शेतीच्या पद्धतीत सुधारणा केल्यास पिकांचे उत्पादन वाढून आदिवासींचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

दारिंगवाडी विभागामध्ये आदिवासींकडे पशुधनसुद्धा फारसे आढळून येत नाही. सरकारने या भागात पशुवैद्यकीय दवाखान्यांची सोय केलेली आहे. ज्यांच्याकडे जमीन आहे. अशा कुटुंबामध्ये बैल, गाय, शेळ्या, कोंबड्या वगैरे जनावरे आढळून येतात. भूमीहीनांकडे मात्र क्वचितच पशुधन पहायला मिळते.

आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी लोकांना कर्ज काढावे लागते. या भागामध्ये ५०% प्रति वर्ष असा व्याजाचा दर आढळून आला. परंतु जर का कर्जदार एकाच गावचे असतील अथवा एकमेकांना परिचित असतील तर व्याजाचा दर २५% प्रति वर्ष असा आकारला जातो. अनुसूचित जातीच्या लोकांमध्ये आपआपसात कर्ज देताना व्याजाची आकारणी केली जात नाही. त्यांच्यामध्ये अडचणीच्या काळात आपल्या जातबंधूंना सांभाळून घेण्याची, मदत करण्याची वृत्ती दिसून येते.

सर्वसाधारणपणे लग्नासाठी ४००० रूपयापर्यंत तर आजारपण, औषधांसाठी १००० रूपयापर्यंत कर्ज काढले



'पोडू'साठी जमीन तयार करताना

जाते. जमीनधारकसुद्धा एवढेच कर्ज काढतात. भूमीहीन कुटुंबांना उन्हाळ्यातील दोन महिने अन्नाचा तुटवडा भासू लागतो. अशा वेळेस गावातूनच १००० रूपये कर्ज काढले जाते. जर ठरलेल्या मुदतीपर्यंत आणि अटींप्रमाणे कर्ज फेडता आले नाही तर सावकार कर्जदाराची जमीन कसतो आणि पिकलेले धान्य व्याज म्हणून वसूल करतो. भूमीहीन कर्ज फेडण्यात अपयशी ठरल्यास त्याला सावकाराच्या शेतावर ठराविक काळ मेहनत करावी लागते.

आठवड्याचा बाजार म्हणजे लोकांकरिता सामाजिक गाठीभेटी घेण्याचे आणि आर्थिक व्यवहार करण्याचे ठिकाण असते. बाजारामध्ये सुंदी जातीचे ओरिया लोक आढळतात. त्यांचा मुख्य व्यवसाय दारू विकणे तसेच सावकारी करणे हा आहे. सुंदी व्यापाऱ्यांशिवाय अनुसूचित जातीचे व्यापारी प्रामुख्याने आठवड्याच्या बाजारात दिसून येतात. शेतकऱ्यांच्या शेतीच्या गरजा भागवण्यासाठी त्यांना आगाऊ पैसे दिले जातात. हळदीची किंमतसुद्धा पीक यायच्या आधीच ठरवली जाते. आदिवासी शेतकरी भाजीपाला, जंगलातून गोळा करून आणलेल्या वस्तू विकतात. कपडे, किराणामाल, सौंदर्य प्रसाधने, भांडी या वस्तूंची खरेदी केली जाते.

शेतमजुरीसाठी गावामध्येच किंवा ओरिया जातीच्या जमीनदारांच्या गावातून काम उपलब्ध असते. एका शेतमजुराला १५ ते २० रूपये रोज किंवा ६ किलो तांदूळ

शेतीच्या कामाची मजुरी म्हणून दिले जातात. महिला मजूर हळद खणून काढणे तसेच हळदीवर प्रक्रिया करणे यासारख्या कामांमध्ये सहभागी होतात. या कामांना लागणारा लाकूडफाटा महिलाच गोळा करून आणतात. शेतावर जरी महिलांनी पुरूषाच्या बरोबरीने काम केले तरी त्यांना पुरूषापेक्षा ५ रूपये कमी मजुरी मिळते.

दारिंगवाडी विभागात अनेक ठिकाणी सरकारने हातपंप बसवून दिले आहेत पण आता त्यापैकी बरेचसे नादुरूस्त झाले आहेत. त्यामुळे स्त्रियांना दूरवर असलेल्या विहिरीवरून अथवा ओहोळावरून पाणी आणावे लागते.

शिक्षणाचा प्रसार या भागात हळूहळू वाढत आहे. बऱ्याच गावांमधून प्राथमिक (४ थी पर्यंत) अथवा पूर्व माध्यमिक (७ वी पर्यंत) शाळा सुरू झाल्या आहेत. काही अनुसूचित जातीची मुले दहावी बारावी तसेच पदवीपर्यंत सुद्धा शिकलेली आहेत. मात्र याऊलट कोंड मुली जास्तीत जास्त चौथी किंवा पाचवी पर्यंतच शिकल्याचे आढळून येते. शालेय शिक्षणाचे दालन गेल्या काही वर्षातच खुले झाल्याने त्याचा लाभ घेणाऱ्या आदिवासींचे प्रमाण कमी आहे. अंगणवाडी गावागावातून सुरू झाली आहे. तर आश्रम शाळा मोठ्या गावातून स्थापन केल्या गेल्या आहेत. मात्र गावातले सर्व प्रौढ निरक्षर असल्याचे दिसते.

## NISWAS (National Institute Of Social Work And Social Sciences)

सरकारने पुरवलेल्या आरोग्याच्या सोयी सुविधा लोकांच्या दृष्टीने खूपच अपुऱ्या आहेत. निस्वास या स्वयंसेवी संस्थेचा फिरता दवाखाना शंभरपेक्षा जास्त गावांना आरोग्य सुविधा पुरवितो. प्रत्येक गावांना केवळ महिन्यातून एकदाच भेट दिली जाते. इतर वेळेस 'निस्वास' ने प्रशिक्षित केलेली स्थानिक आरोग्य सेविकाच लोकांच्या आरोग्यविषयक प्राथमिक गरजा भागवते. या भागात मलेरियाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळून आला. बालमृत्युचे प्रमाणही बरेच आहे. स्त्रियांचे जननसंस्थेचे विकार अनेकदा तज्ज्ञ डॉक्टरच्या मार्गदर्शनाअभावी दुर्लक्षितच राहतात.

या भागामध्ये खासगी डॉक्टरसुद्धा अभावानेच आढळतात. आपल्या आरोग्य विषयक तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आदिवासी दारिंगवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात. वाहतुकीच्या साधनांअभावी रूग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत आणण्याचे काम जिकिरीचे होऊन बसते. काही लोक परंपरागत वैदूकी करणाऱ्या 'गुनिया' कडून झाडपाल्याचे औषधोपचार करून घेतात.

दारिंगवाडी विभागातल्या जमीन असणाऱ्या तसेच भूमीहीन आदिवासी कुटुंबाच्या रहाणीमानाची कल्पना यावी म्हणून वर्षभरात होणारा अंदाजे खर्च पुढील तक्त्यात दिला आहे. ही माहिती निश्चितच उद्बोधक ठरेल.

## तुमडीबंध विभाग

फुलबनी जिल्ह्यातील तुमडीबंध हे महत्वाचे गाव. मुनीगुडा-रायगड आणि मदनपूर-रामपूर या रस्त्यांना जोडणारे तुमडीबंध शहर आहे. बेलघर उपविभागात २००० फूट उंच असलेली डोंगर रांग पसरलेली आहे. जंगलांनी व्यापलेला हा विभाग हत्ती, वाघ, अस्वल यासारख्या वन्य प्राण्यांसाठी प्रसिद्ध आहे.

तुमडीबंध विभागातील सपाट प्रदेशात देसिया कोंड लोक रहातात. तर बेलघर या डोंगराळ व जंगल भागामध्ये कुटिया कोंड ही आदिवासी जमात आढळून येते. कुटिया कोंड लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला नाही. काही लोक स्वत:ला जरी हिंदू म्हणवत असले तरी ते आपल्या पूर्वापार परंपरेने चालत आलेल्या प्राणीरूपी देवांचीच पूजा करतात. या भागात अनुसूचित जातीचे लोक फारसे आढळून येत नाहीत.

कुटिया कोंड स्त्रिया या चेहऱ्यावर देसिया कोंड

## आदिवासी कुटुंबाचा वार्षिक खर्च

| तपशील | जमीन असणारे कुटुंब | भूमीहीन कुटुंब |
|---|---|---|
| घरदुरूस्ती | ३०००-४००० रू. (छपरासाठी) | ३०००/- रू. (घर शाकारण्यासाठी) |
| बैलजोडीचे भाडे | २०० रू. / दिवस | ---- |
| भाजीपाला, मांस, मासे | २००० रू. | १०००-१५०० रू. |
| स्वयंपाकासाठी तेल | २५०-४०० रू. | बाजारातून विकत आणत नाहीत. जंगलातील मोहाच्या फळांपासून तेल काढतात. |
| कपडे | १२००-२००० रू. | ८००-१६०० रू. |
| आजारपण (औषधे डॉक्टरची फी वगैरे) | ५००-२००० रू. | ५०० रू. |
| शिक्षण (कपडे, वह्या-पुस्तके) | १५०-४०० रू. | ---- |
| इंधन (रॉकेल) | २५० रू. | २५० रू. |
| तंबाखू | १५०-२०० रू. | २००-३०० रू. |
| दारू | ७००-१००० रू. | २००-५०० रू. |
| सण समारंभ | ५००-१००० रू. | १०००-१५००रू. |
| दरडोई वार्षिक खर्च (अन्नाव्यतिरिक्त) | ८००-१५०० रू. | ९००-१२०० रू. |

स्त्रियांप्रमाणे गोंदवून घेत नाहीत. स्त्रिया साडीच नेसतात मात्र चोळी घालण्याऐवजी एक मोठे फडके गळ्याभोवती गुंडाळून त्याची टोके मोकळी सोडतात ज्यायोगे स्तन झाकले जातात. पुरूष कमरेला लुंगीच गुंडाळतात. तुमडीबंध बेलघर भागामध्ये बरीच पोरे उघडी नागडी होती. त्यांच्यात कुपोषणाची लक्षणेदेखील दिसत होती. इथले पुरूष लोक ओरिया भाषा समजू शकतात. मात्र स्त्रियांना केवळ त्यांची स्थानिक भाषा 'कुई' च येते.

इथे असलेल्या प्रत्येक गावाच्या मध्यभागी पवित्र ठिकाण आढळते. त्याठिकाणी दगडांचा ढीग रचलेला असतो. तसेच एक उंच लाकडी खांब उभारलेला असतो. त्याच्या टोकाला म्हशीच्या शिंगासारखा आकार दिलेला असतो. घरांची रचना नेहमीप्रमाणेच आढळते. घरांना तसेच शेतांना बांबूचे कुंपण सर्व ठिकाणी दिसून येते. सर्व घरांमध्ये गावातील पुजाऱ्याचे घर भिंतीवरच्या नक्षीमुळे खास उठून दिसते.

कुटिया कोंड जमातीमध्ये त्यांची स्वत:ची अशी न्याय निवाड्याची पद्धत आहे. त्यासाठी प्रत्येक गावामध्ये खास न्यायपंचायत असते.

'पोडू' च्या धार्मिक विधींमध्ये रेड्याचा बळी देण्याची प्रथा आहे. जेव्हा मुलीला पळवून नेऊन विवाह केला जातो.



हळदीवर प्रक्रिया करताना आदिवासी युवक

तुमडीबंध विभागामध्ये 'कुटिया कोंड विकास संस्था' ही आदिवासींसाठी काढलेली शासकीय संस्था कार्यरत आहे. या संस्थेतर्फे शेतीसाठी लागणारी अवजारे तसेच इतर साहित्यासाठी, जनावर खरेदीसाठी, मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी कर्ज दिले जाते. या संस्थेच्या एका पदाधिकाऱ्याच्या मतानुसार इथले आदिवासी खूप कष्टाळू आहेत. तसेच त्यांना कामाचा चांगला मोबदला देखील मिळतो मात्र ही लोकं दारू पिऊन मजा करण्यामध्ये तसेच पशुंचा बळी देण्यामध्ये सर्व पैसा खर्च करून टाकतात. कस्तुरबा ट्रस्ट सारखी गांधीवादी विचारसरणी असणारी स्वयंसेवी संस्था आणि सर्वोदयी कार्यकर्ते काही गावांमधून कार्य करत आहेत. त्यांनी दारूबंदी तसेच शिक्षणाचा प्रसार या दोन मुख्य विषयांवर भर देऊन जनजागृतीचे कार्य हाती घेतले आहे.

## ओरिसातील आदिवासी स्त्री

**देसिया कोंड स्त्री :** या स्त्रीचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या शरीरावर निरनिराळ्या प्रकारची नक्षी गोंदवून काढलेली असते. कुठल्याही पुरूषाची वाईट नजर पडू नये म्हणून ही नक्षी काढली जाते. आजकाल बाहेरच्या जगाशी संपर्क वाढत चालल्याने गोंदवून घेण्याची प्रथा कालमानपरत्वे हळूहळू कमी होत चालली आहे. स्त्रियांच्या म्हणण्याप्रमाणे गोंदवून घेताना खूपच त्रास होतो, आणि आता तर मुली शाळेत शिकायला लागल्यापासून ही प्रथा फारशी पाळली जात नाही.

अशा वेळेस मुलाकडची लोकं मुलीकडच्या लोकांना दंड म्हणून रेडा देतात. त्याचासुद्धा बळी दिला जतो. तरूण युवक तसेच स्त्रिया रेड्याचे मांस खाण्यास आजकाल तयार होत नाहीत. वराह, बकरा तसेच कोंबड्यांचा बळी देण्याची प्रथा कोंड आदिवासींमध्ये आढळून येते.

देसिया कोंड स्त्रीच्या कानामध्ये १५ छोट्या गोल रिंगा कान टोचून घातल्या जातात. नाकसुद्धा तीन ठिकाणी टोचले जाते. सोन्याचे दागिने अभावानेच पहायला मिळतात. एखाद्याची ऐपत असेल तर पायात तोडे तसेच दंडामध्ये वाकीसुद्धा घातली जाते.

पोशाखाबद्दल बोलायचे झाले तर सर्व बायका साडी नेसतात. वृद्ध स्त्रिया चोळी (ब्लाऊज) घालत नाहीत. मात्र तरूण स्त्रियांमध्ये चोळी घालायचे प्रमाण वाढले आहे.

**कुटिया कोंड स्त्री :** कान दोन ते चार ठिकाणी टोचून त्यामध्ये गोल रिंगा घातल्या जातात. शरीरावर ठिपक्यांची नक्षीच गोंदवली जाते. या स्त्रिया कमरेभोवती साडी नेसतात. चोळीचा वापर करत नाहीत, स्तन झाकण्यासाठी गळ्याभोवती फडके घेतले जाते. कंगव्याचा वापर चापासारखा केला जातो. गळ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या मण्यांच्या माळा घालतात.

**डोंगरिया कोंड स्त्री -** देसिया कोंड स्त्रियांसारखेच कान पंधरा ठिकाणी टोचून त्यामध्ये गोल रिंगा घालतात. नाकसुद्धा तीन ठिकाणी टोचलेले असते. मात्र नाकात सोन्याच्याच रिंगा घालतात. गळ्यामध्ये जर्मन सिल्व्हर या धातूचे कडे घातलेले असते. तसेच कमरपट्टाही घालतात. डोंगरिया कोंड स्त्री चोळी अजिबात घालत नाही मात्र त्यांची रंगीत नक्षीदार काठाची पांढरी साडी चित्त आकर्षून घेते.

### धर्म

दारिंगवाडी भागातील देसिया कोंड बॅप्टिस्ट ख्रिश्चन पंथाचे आहेत तर येथील अनुसूचित जातीचे लोक रोमन कॅथॉलिक पंथाचे आहेत. काही खेड्यांमधून देसिया कोंड लोक कॅथॉलिक पंथाचा मार्ग अनुसरताना दिसतात. येथील चर्चचा खास करून स्त्रियांवर जास्त प्रभाव आहे. तरूण स्त्रिया चर्चच्या निरनिराळ्या कामांमध्ये, कार्यक्रमांमध्ये हिरिरीने भाग घेताना दिसतात. पारंपारिक पद्धतीपेक्षा या धर्मामध्ये स्त्रियांना खचितच एक वेगळे स्थान आहे.

कुटिया कोंड आणि डोंगरिया कोंड आपला आदिवासी धर्म आणि संस्कृती अजूनही जपताना दिसतात. कुटिया कोंड स्त्रीला धार्मिक कार्यामध्ये कुठलेही स्थान नसते. (बळी चढवलेल्या) वराहाचे किंवा म्हशीचे मांस हे स्त्रियांसाठी निषिद्ध मानले जाते. परंतु बळी दिल्यानंतर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये स्त्रियासुद्धा सहभागी होऊन पुरूषांच्या बरोबरीने नाचतात, गातात. काही खेड्यांमधून आदिवासी स्त्रियांनी हिंदू असल्याचे सांगितले. बिसम कटक मधील अनुसूचित जातीच्या लोकांनीसुद्धा आपण हिंदू धर्माचे असल्याचे सांगितले.

### शिक्षण

या सर्व आदिवासी भागामध्ये जवळजवळ सर्व महिला निरक्षर आहेत. त्यांच्यापर्यंत प्राथमिक शिक्षणसुद्धा पोहोचले नाही. आणि पुढील काही वर्षात महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात काही फरक पडेल असे वाटत नाही. कुटिया कोंड आणि डोंगरिया कोंड आदिवासींची वस्ती असलेल्या गावांमध्ये शिक्षणाचा प्रसार हळूहळू व्हायला लागला आहे.

या भागात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींमध्ये मात्र शिक्षणाची आवड असल्याचे तसेच पालकांचाही मुलींना शिक्षण देण्यावर भर असल्याचे आढळले.

### अर्थार्जन

ओरिसातील आदिवासी स्त्रीला घरातील कामांबरोबरच इतरही कामे करावी लागतात. जंगलातून कंदमुळे, फळे, भाजीपाला आणणे, जळणासाठी लाकूडफाटा गोळा करणे ही कामे घरातील स्त्रियांचीच असतात. शेतीपासून मिळणारे उत्पन्न बेभरवशाचे तसेच अपुरे असल्याने महिलांना अर्थार्जनासाठी घराबाहेर जाऊन मोलमजुरीदेखील करावी लागते.

७०-७५ % स्त्रिया आसपासच्या गावांमध्ये शेतावर किंवा रस्ता तयार करण्याच्या कामावर मजूर म्हणून जातात. कामाचा मोबदला म्हणून दर दिवशी १० ते १५ रूपये रोख किंवा ४ ते ५ किलो तांदूळ मिळतात. जर का कंत्राटी काम असेल तर दिवसाला २० रूपये मजुरी मिळते. स्त्रीला मिळणारा कामाचा मोबदला पुरूषांपेक्षा कमी असतो. पुरूषांना महिलांपेक्षा ५ रूपये किंवा १ किलो धान्य अधिक दिले जाते. मजुरी करणाऱ्या महिला कामासाठी फार दूरच्या गावांना स्थलांतर मात्र करत नाहीत.

आदिवासी आणि अनुसूचित जातीतील महिला वर्षातील बाराही महिने निरनिराळ्या प्रकारच्या कामांमध्ये व्यस्त असतात. ज्या कुटुंबांमध्ये स्वत:ची शेती असते तसेच 'पोडू' मध्येही सहभाग असतो अशा घरांमध्ये घरातील स्त्रीला दुप्पट काम करावे लागते. आदिवासी स्त्रीला वेगवेगळ्या आघाड्यांवर एकाच वेळेस लढावे लागते. स्वत:च्या कुटुंबाच्या मालकीच्या शेतावर काम करणे, 'पोडू' मध्ये कामाचा वाटा उचलणे, जंगलातील वस्तू, लाकूडफाटा गोळा करून विकणे, याशिवाय तिला घरामध्ये गृहीणीचे काम करावेच लागते. मुलांना सांभाळणे, आपल्या पतीची मर्जी राखणे, नातेवाईक, परिचित लोकांची सरबराई करण्याची जबाबदारी पण घरातील स्त्रीवरच असते.

दारिंगवाडी भागामध्ये स्थिर शेती, स्थलांतरित शेती ('पोडू') तसेच हळद आणि आले ही पिकेही घेतली जातात. या सर्व शेतीच्या कामात महिलांचा महत्वपूर्ण सहभाग असतो. याशिवाय परसबागेतील भाजीपाला तसेच जंगलातील वस्तू गोळा करून आणणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि विकणे ही कामे सुद्धा स्त्रियांनाच करावी लागतात.

'पोडू' पद्धतीच्या शेतीमध्येसुद्धा स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने काम करतात. कारण या पद्धतीमध्ये जमिनीचा तुकडा देताना प्रत्येक कुटुंबातील उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा विचार केला जातो. पोडूमध्ये झाडे तोडणे, साफसफाई करणे, राब करणे, लावणी करणे, तण काढणे, पीक कापणे या सर्व शेतीच्या कामांमध्ये स्त्रिया पुरूषांइतकीच बरोबरीने मेहनत करतात. जमिनीची राखण करण्याचे काम मात्र पुरूषांकडेच असते. हळदीच्या पिकाबाबत सुद्धा हीच स्थिती आहे. खणून हळद काढणे, स्वच्छ धुणे आणि वाळवणे ही कामे स्त्रिया करतात तर विकण्याचे काम मात्र पुरूष करतात.

'पोडू' पद्धतीमध्ये सुद्धा आता हळूहळू राजकारण शिरत चालले आहे. ज्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अशी कुटुंबे आपल्या वाट्यापेक्षा अधिक जमिनीचे तुकडे मिळवू लागले आहेत. तसेच हे जमिनीचे तुकडे सुपीक असतील याचीही काळजी घेतली जाते. सहाजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला नापीक व खडकाळ जमिनीचा तुकडा येतो. त्यामुळे अशा गरीब कुटुंबातील स्त्रियांना अधिक अंगमेहनत करावी लागते. सतत जास्त कामाच्या शारीरिक आणि मानसिक तणावाखाली राहिल्याने आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्याचे आदिवासी स्त्रियांनी सांगितले.

कुटिया कोंड जमातीचे प्राबल्य असलेल्या भागात विधवा स्त्रियांनादेखील 'पोडू' मध्ये सहभागी करून घेतले जाते. तसेच त्यांना पीक काढण्यासाठी वेळोवेळी मदतही केली जाते. दारिंगवाडी भागामध्ये मात्र याउलट चित्र पहायला मिळते. असहाय्य तरूण विधवेला इतरांच्या सहाय्याविना स्वत:च्या वाटणीचा जमिनीचा 'पोडू' मधील तुकडा पडीकच ठेवावा लागतो. नागर संस्कृतीतून हळूहळू ग्रामीण आदिवासी भागात शिरत चाललेल्या आत्मकेंद्रित वृत्तीचे द्योतकच म्हणावे लागेल.

### घरातील दैनंदिन कामे

शेती, 'पोडू', मजुरी यासारख्या कामांमध्ये पुरूषाच्या बरोबरीने काम करणारी आदिवासी स्त्री घरातील कामेसुद्धा तेवढ्याच हिरीरीने करत असते.


पहाटे लवकर उठून सर्वप्रथम जवळच्या ओहोळावर जाऊन पाणी आणले जाते. दारिंगवाडी भागात वीज अजून पोहोचली नसल्याने सर्व दळण घरीच दळावे लागते.

भात, तसेच इतर तृणधान्ये घरच्या घरीच कांडली जातात. वापरासाठी 'सालोर महुर्शी' या झाडाच्या बियांपासून तेलसुद्धा घरीच काढले जाते. दळण-कांडण झाल्यावर स्वयंपाक करणे, मुलांची देखभाल करणे, घरातील लोकांना न्याहारी वाढणे वगैरे कामे उरकल्यावर जनावरांची देखभाल करून आदिवासी स्त्री शेतावर जाते. संध्याकाळी शेतावरून आल्यावर परसबागेतील झाडे, भाजीपाल्याची निगा राखण्याचे काम स्त्रियाच करतात. संध्याकाळी पाणी भरणे, मुलांकडे लक्ष देणे स्वयंपाक करणे अशी कामे करतात.

**जंगल उत्पादने**

आदिवासी आणि जंगलांचे अतूट असे नाते आहे. मुख्य प्रवाहापासून आतापर्यंत दूर असलेल्या या आदिवासींना दैनंदिन जीवनात तसेच अडीअडचणीच्या काळात जंगलंच साथ देत आले आहे. जंगलातील वस्तू गोळा करण्याचे काम प्रामुख्याने स्त्रियांकडूनच केले जाते; घरासाठी अगर जळणासाठी मोठे लाकूड अथवा ओंडके तोडायचे, आणायचे असले तर मात्र हे काम पुरूषाकडे येते.

आदिवासी स्त्रिया जंगलातून भाजीपाला, फळे, मोहाची **फुले, मोहाची फळे** - ज्यापासून घरगुती वापरासाठी तेल काढले जाते वगैरे गोळा करतात. 'सिओली' नामक वृक्षाची पाने गोळा केली जातात त्यापासून द्रोण आणि पत्रावळी तयार करून विकणे हाही इथल्या आदिवासी स्त्रियांचा व्यवसाय आहे. याशिवाय आरारूट, मध, डिंक, एरंडाच्या बियासुद्धा गोळा केल्या जातात. एका खास प्रकारच्या गवताच्या काड्या गोळा करून त्यापासून झाडू बनवले जातात. बांबूपासून अत्यंत आकर्षक अशा चटया सुद्धा बनवल्या जातात.



कोंड स्त्री

दारिंगवाडी भागात सरकारने आदिवासींना तयार केलेला माल खरेदी करण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली आहे. परंतु बऱ्याच लोकांना या महामंडळाबद्दल अजिबातच माहिती नव्हती. तुमडीबंध भागात मात्र डोंगराळ प्रदेशासाठी स्थापन केलेल्या सहकारी संस्थेमार्फत तयार केलेल्या या वस्तूंची तसेच गोळा केलेल्या जंगलोत्पादनांची नियमितपणे खरेदी होते. अडीअडचणींच्या वेळेला मात्र याच वस्तू स्थानिक दुकानदाराला अथवा आठवड्याच्या बाजारामध्ये विकल्या जातात. मात्र अशा व्यवहारांमध्ये आदिवासींना बऱ्याच वेळा लुबाडले जाते कारण असे व्यवहार वस्तुविनिमय पद्धतीने चालवतात. उदा. १किलो मोहाच्या फुलांच्या बदल्यात १ किलो मीठ दिले जाते.

आदिवासींना अशा व्यवहारात तोटाच सहन करावा लागतो. मात्र मीठासारखा दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळवण्यासाठी त्यांना असे व्यवहार करणे भाग पडते.

**लाकूड फाटा** - घरामध्ये रोजच्या वापरासाठी इंधन आणणे हे एक महत्त्वाचे काम असते. आदिवासी स्त्रिया जेव्हा जंगलामध्ये वस्तू गोळा करायला जातात. त्यावेळेस परत येताना लाकडाची मोळी डोक्यावरून वाहून आणतात. आता जसजसा आसपासच्या जंगलाचा ऱ्हास होत चालला आहे तसतसा लाकूडफाट्याचा प्रश्न अधिक बिकट होत चालला आहे. तुमडीबंध तसेच बिसम कटक भागामध्ये एक लाकडाची मोळी जंगलातून तोडून आणण्यासाठी आदिवासी स्त्रीला कमीत कमी तीन ते चार तास वेळ खर्च करावा लागतो. यामुळे स्त्रियांचे काम अधिकाधिक वाढतच जाते व त्याचा ताण त्यांच्या शरीरावर पडतो. ज्या ठिकाणी 'पोडू' पद्धतीची शेती केली जाते तिथे लाकूडफाट्याचा प्रश्न येत नाही, कारण जंगल साफ करताना जे लाकूड तोडले जाते ते व्यवस्थितपणे साठवून त्याचा वापर केला जातो.

ओरिसाचा आदिवासी भाग जंगलांनी समृद्ध आहे. जवळजवळ वर्षातले ९-१० महिने नद्या, नाले, ओहोळ भरून वहात असतात. इथली भूजल पातळी चांगली आहे.

ओरिसा सरकारने बऱ्याच गावांमधून हातपंप बसवले आहेत. दारिंगवाडी भागातल्या बडगाव, टेकेरवाडी, जानबाडी कलियामाला, पाखालमा, मारगीपोंगा या गावातील हातपंप नादुरूस्त झाल्याने स्त्रियांना दूरवर जाऊन छोट्या छोट्या ओहोळांवरून पाणी आणावे लागते. पाणी भरण्यात खूपच वेळ मोडतो. तसेच हे पाणी बरेच वेळा अशुद्ध देखील असते. ओहोळाचे पाणी मार्च-एप्रिलमध्ये आटते. त्यानंतर पावसाळ्यापर्यंत परत पाण्यासाठी वणवण सुरू होते.

तुमडीबंध, बिसम कटक, मुनीगुडा आणि मदन रामपूर भागामध्ये हातपंप जरी व्यवस्थित असले तरी एप्रिल-मे महिन्यांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते.

ओरिसातील पाहणी केलेल्या भागातील मुख्य समस्या 'पोडू' या स्थलांतरित पद्धतीच्या शेतीमुळे निर्माण झाली आहे. या 'पोडू' पद्धतीमुळे जंगल नष्ट होत चालले आहे. पूर्वी १० ते १५ वर्ष एकाच जमिनीवर पिके घेतली जायची तर आता केवळ ३ ते ४ वर्षच एका जागी पिकं घेतली जातात. उत्पन्नाचे अन्य काहीच साधन उपलब्ध नसल्याने उपजीवीका करणे दिवसेंदिवस कठिण होत चालले आहे. देसिया कोंड आणि कुटिया कोंड जमातीच्या लोकांकडे ५ एकरापेक्षा जास्त जमीन नाही. उपलब्ध असलेली जमीनसुद्धा नवीन पिढीच्या सदस्यांमध्ये विभागली जात आहे. हरिजन अथवा अनुसूचित जातीचे लोक भूमिहीन आहेत. मात्र त्यांचे आदिवासी जमातींशी चांगले संबंध आहेत.

बिसम कटक भागातील डोंगरिया कोंड जमातीच्या लोकांनी फळझाडे लावण्यास सुरूवात केली आहे. अननस, आंबा, केळी, हळद, फणस तसेच इतर फळांची लागवड केली आहे. अनुसूचित जातीचे लोक उत्पादन झालेल्या फळांचा व्यापार करण्यासाठी पुढे आले आहेत. चतिकोना हे व्यापाराचे मुख्य केंद्र बनले आहे. इथे रेल्वे स्थानक असल्याने मध्य प्रदेशातून देखील व्यापारी माल खरेदी करण्यासाठी येतात. यामुळे कोंड तसेच हरिजनांची आर्थिक परिस्थिती सुधारत चालली आहे. महत्वाचे म्हणजे 'पोडू' पद्धतीची शेतीसुद्धा हळुहळू कमी हाते चालली आहे. त्याचबरोबर जंगलतोड देखील थांबत आहे.

फळझाडांच्या लागवडीखाली असलेल्या जमिनीची मालकी हा एक वादाचा मुद्दा असला तरी ही जमीन महसूल खात्याची असल्याचे मानले जाते. सरकारच्या डोंगरिया कोंड विकास परिषदेतर्फे फळझाडांच्या लागवडीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या भागातील महिलासुद्धा चतिकोना या बाजार केंद्राशी संपर्क साधू लागल्या आहेत.

ओरिसातील आदिवासी भागांमध्ये आढळून आलेली चांगली गोष्ट म्हणजे हळदीचे उत्पादन तसेच प्रक्रिया, परसबागेमध्ये भाजीपाला, केळी, फणस, आंबा यासारख्या फळझाडांची लागवड. यावरून असे लक्षात येते की जर का या आदिवासींना योग्य संधी उपलब्ध करून दिली तर त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा वापर करून ते निश्चितच यशस्वी उत्पादक होऊ शकतील.

हरिजन अथवा अनुसूचित जातीच्या लोकांकडे टोपल्या विणणे, पत्रावळी तयार करणे, सुतार काम, व्यापार यासारखी कौशल्ये आहेत. हरिजनांच्या तुलनेत आदिवासी लोकांचा जंगलाशी जास्त संबंध येतो. पुरूष आणि स्त्रिया दोघेही जंगलातील वस्तू गोळा करण्यासाठी जातात. जंगलामध्ये शिकार करणे हाही आदिवासींचा एक आवडीचा छंद आहे.

आदिवासींना पिकवलेले धान्य केवळ सहा ते आठ महिनेच पुरू शकते. त्यानंतरच्या काळात जंगलातील फळे, कंद, भाजीपाला, शिकार यावरच ते आपली गुजराण करतात. अर्थार्जनासाठी त्यांना स्थलांतर करावे लागत नाही. स्थलांतर करून काम मिळवण्याजोगी औद्योगिक नगरेही ओरिसात नाही.

इथल्या आर्थिक व्यवहाराच्या सर्व नाड्या बिगर आदिवासी व्यापाऱ्यांच्या हातात एकवटलेल्या आहेत. आठवड्याच्या बाजारातदेखील त्यांचेच प्राबल्य दिसून येते. जरी काही आदिवासी हळद पिकवून पैसा मिळवत असले तरी हा व्यवहार फारसा फायद्याचा नसतो. मोठ्या गावातील व्यापारी हळद पिकायच्या आधीच खरेदीचे व्यवहार पूर्ण करतात. या व्यवहारात आदिवासींचा फायदा होण्याऐवजी शोषणच अधिक होते.

ओरिसातील या आदिवासी भागामध्ये निरनिराळ्या योजना राबवल्या जातात. पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र यासारख्या मूलभूत सोयी उपलब्ध असल्या तरी त्या पूर्णपणे कार्यरत नाहीत. आदिवासींच्या मुलांपेक्षा अनुसूचित जातीच्या मुलांचे शिकण्याचे प्रमाण अधिक आहे. हरिजन जातीच्या मुलांचे शिकण्याचे प्रमाण अधिक आहे. हरिजन मुले शिक्षणाच्या सोयी सवलतींचा लाभ घेताना दिसतात. अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये पूर्वापार चालत आलेल्या समाजाच्या उतरंडीला अजिबात धक्का लावला जात नाही. प्रत्येक जात व जमात आपापला दर्जा, वेगळेपण जपत असतात. ख्रिश्चन धर्म स्वीकारलेली लोकं सुद्धा हे संकेत पाळतात आणि म्हणूनच ख्रिश्चन धर्मातलेच दोन वेगवेगळे पंथ आढळून येतात. देसिया कोंड मुली आता शिक्षणाकडे वळू लागल्या आहेत. ख्रिश्चन धर्माचा प्रभाव तसेच शिक्षणाच्या प्रसारामुळे चेहऱ्यावर गोंदवून घेण्याचे प्रमाण खास करून तरूणींमध्ये कमी होत चालले आहे.

काही गावांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांमुळे दारूविरूद्ध महिलांमध्ये जागृती निर्माण झाली आहे. दारू पिणे, पत्नीला मारहाण करणे अशा प्रकारांविरूद्ध महिला आता चळवळ करू लागल्या आहेत.

'पोडू' पद्धतीच्या शेतीवर पूर्वीपासून समाजाची घट्ट पकड होती. मात्र आता ही पकड हळूहळू सैल होऊन मूठभर धनदांडग्याच्या हातात जात चालली आहे. त्यामुळे जमिनीचे वाटप करताना विधवा, परित्यक्ता स्त्रिया तसेच गरीब कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे.

● ● ●

# TRIBAL DEVELOPMENT PROGRAMME IN MAHARSHTRA AND ORISSA

**- Prof. R. K. Mutatkar**

It is believed that traditionally, the tribals have been the collectors of food from the forest, miles away from the market economy. In historical times, caste hindu peasantry suffered from drought and famine but the tribals survived as a result of dependence on the forest food. Now, the depletion of forest and natural resources like soil and water, fodder and fuel and their exploitation by non-tribals,has resulted in starvation, malnutrition and degradation of the quality of life and loss of nerve. Most affected are the tribal women who face the scarcity of fodder, fuel and drinking water.

This process is sought to be reversed by the Bhartiya Agro-industries Foundation, Pune and National Institute of Social Work and Social Sciences, Bhuvaneshwar with the assistance from NABARD under an agreement with a German Development Bank, KFW.

This summary of the more extensive field feasibility report in Marathi represents the studies undertaken by Prof R.K.Mutatkar,an anthropologist, Dr.A.P.Kulkarni, an economist and Ms.Nancy Gaikwad,a rural sociologist during summer of 1996, in Thane and Nasik districts of Maharashtra, and Phulbani,Rayagada and Kalahandi districts of Orissa.

The scientific methodology of rapid assessment was followed, by first running over the area to get a general feel and select atleast two villages in each taluk for detailed investigation.Detailed family schedules, ten each from the selected villages,were supplemented with interviews of village leaders and women. Group interviews of women were also undertaken.Market surveys were undertaken to judge the present situation and to assess the market forces in order to recommend viable horticulture development programme.

The programme of development envisages what is commonly known as Wadi project of BAIF, whereby the poor tribals are helped to develop horticulture as a means of sustenance.The programme has been successfully implemented by BAIF in tribal areas in Maharashtra and Gujrat.

**MAHARASHTRA :**

Food scarcity leading to migration to urban areas as casual labour is the main problem in the Mokhada taluk in Thane

district, and Peth - Surgana taluks in Nasik district.Food lasts in varying degrees for three to nine months which leads to indebtedness.There is plenty of surface water but there are no watershed development programmes. People are willing to accept modern technology for production of fruits and vegetables , as also take up double crop,depending upon the availability of water. This is visible in Peth taluk where irrigation facilities are available.Scarcity of drinking water in summer is a nightmare to women who were seen queing up at midnight at the village well.

The spread of education in Maharashtra is visible as also the modern amenities like electricity and television.This has led to problem of educated unemployed tribal youth who do not want to toil on their lands but aspire for fixed income jobs and are interested in the game of cricket.

In Mokhada,on the whole, around 20% to 30% tribals are landless and majority of the remaining have less than 5 acres of land, under cultivation.Predominant cropping pattern refer to Nagli 40%,Paddy 30 - 40%, Varai 10% and Lentil, oilseeds and pulses together 10 - 20% In Nasik, Paddy is 60% and Nagli or Ragi is 30%

Encroachment of forest land is very common.There is widespread alcoholism amongst males which is a problem for the women.

**ORISSA :**

The striking feature of tribal scene in Phulbani, Rayagada and some parts of Kalahandi is the cohabitation of the scheduled tribes and scheduled castes in the villages. The traditional hierarchy persists and also gets reflected among those who have embraced christianity.The ST. and SC. do not belong to the same christian order and have separate churches. The tribals consider themselves as the custodians and trustees of the natural resources such as the forest and the lands and the SC have to use these at the pleasure of the tribals. However, a symbiotic relationship exists among the two communities. Although landless, the SC are good artisans and make their living on trade, mat weaving, broom making,basketry and carpentry. They do trading for the tribals.SC are relatively better educated and can communicate with the outside world more effectively.

There is far better tree cover in Orissa than in Maharashtra which is threatened with the shifting cultivation,PODU,, practised by the tribals. Unlike Maharashtra, there are no industrial urban areas in the vicinity of tribal areas.Although food security problems are similar, there is no migration to urban areas but the onslaught is on the forest covered land.

The tree cover on the roadside comprised of mango,jackfruit,

sal,bamboo,occasional cashew, mahua, salap and umber. Within village boundaries and in the backyard of the houses,there is cultivation of mango,jackfruit,papaya, beans, guava and ber. Castor and cactus are used as house fence. Turmeric and ginger are the main cash crops in the area.

Podu is practised on communist principles, each according to the need prescribed by the village council.Destitutes and old widows get their share in the podu land and cultivation for their living. The main crops are paddy, maize and occasional ragi on flat lands while other crops are raised on podu land.

A person with 1 to 3 acres of land gets paddy to last 3 -5 months for a family of six members.Ragi and millets supplement for another three months which is further supplemented from forest collection of mango kernel,mahua flowers, tubers and green leafy vegetables. Income from sale of pigs,bamboo, tamarind and labour help to tide over the year.

Although drinking water is not a major problem, depletion of forest has led to problem of firewood. Alcoholism among men is being resisted by women by organising themselves. There is a wide spread practice of tattoing of women's faces among the Desia Kondhs on the plains which is now declining among the adolescents.

Among the Dongaria Kondh in Rayagada district, in Bissam-Cuttack block, The Dongaria Kondh Development Agency has developed horticulture by way of pineapple and banana plantations, as also mango,turmeric and jackfruit.The SC do the trading at Chatikona in the plains with traders from Raipur in Madhya Pradesh at the railhead.Podu has distinctly reduces in this area as a result.The fruit processing factory in the plains is however closed due to political forces.The Kutia Kondh in Belghar area are primitive and the children appear malnourished and afflicted with disorders of the stomach.

**CONCLUSION :**

It is thus clear that one of the ways of developing tribal areas and people is through the method of horticulture development.The people are willing to accept or update the technology which they possess.Alongwith production, monitoring will have to be done in marketing and by developing the processing industry. Mango is a traditional fruit both in Orissa and Maharashtra. Cashew nut has a potential in Orissa as also improvement in the traditional crop of turmeric.The degradation of tribal life is more marked in Maharashtra due to seasonal migration to the urban areas in construction activities. Orissa tribals still maintain a symbiotic relationship with forest ecology.

● ● ●

# सूची

| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सत्तावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |
| अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९४ - आदिवासी जमाती |
| अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून | १९९५ - राणीपूर विशेषांक |
| अंक त्रेसष्ठ : जुलै-सप्टेंबर | १९९५ - कुपोषण विशेषांक |
| अंक चौसष्ठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९५ - पर्यावरण विशेषांक |
| अंक पासष्ठ : जानेवारी - मार्च | १९९६ - आदिवासी जमाती |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune - 30.